विजय खाडिलकर



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

रोशनविल्ला

कथासंग्रह

श्री विजय खाडिलकर

रोशनविल्ला

लेखक: विजय खाडिलकर

1403, माझगांव टॉवर्स, म्हातारपाखाडी,

माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

इ मेल vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ३० ऑक्टोबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १९५/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- विजय खाडिलकर - ९८२१२२२०४२

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री विजय खाडिलकर

कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना “खिडक्या”, “भोज्जा” व “धर्म” या कथासंग्रहांचे लेखक आणि वास्तुपुरुष आणि मोर्चा या नाटकांचे नाटककार म्हणून ओळखतात. त्यांच्या सहाही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे सातवे पुस्तक. पाचवा कथासंग्रह.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. खिडक्या, लालबत्ती, सरसरती सर. परिक्रमा: हे कथासंग्रह व वसंतचाहूल हा कवितासंग्रह, पारंब्या.. ही कोमसाप स्पर्धेत पारितोषिक पात्र कादंबरी. या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते, त्याचबरोबर त्याहून वेगळं

लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

पात्रांच्या मागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा पूल असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

विजय खाडिलकरांचं हे पुस्तक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य

अर्पणपत्रिका:

"कोकणातल्या टुमदार जगण्याला समर्पित"

** रोशनव्हिला **

लोक उगाच त्या घराला बंगला म्हणायला लागले.. होतं नेहमीसारखंच घर...

पण वकिल होते ना! लोकांना म्हणावंच लागत असेल..विशेषत: बोर्डावरचं नांव वाचून! रोशनव्हिला...म्हणे!

बैलगाडीच्या चाकोऱ्या नि क्वचित बाईकच्या खुणा असलेली पायवाटेपेक्षा मोठी वाट

डावीकडून येऊन पुढच्या मोठा सडकेला मिळालीय त्या कोनात दोन पाट्या दिसत..

कुंपणापलिकडच्या शेजाऱ्याच्या पोल्ट्रीची जाहिरात आणि अलिकडे हा वकिलांच्या बंगल्याच्या नांवाचा बोर्ड....

बंगला म्हणजे ते माडीचं कौलारू घर मुख्य सडकेपासून आत दूर असूनही

कोपऱ्यातला नामफ़लक मात्र रोशनव्हिला हे शीर्षक आणि, वकिलांच्या डिग्र्यांची, बीए.एलएलबी वगैरेची आगगाडी मिरवीत उभा होता! दोन मोडक्या पायांवर..ही तशी अगदी अलिकडची नव्हे पण वकिली सुरू केल्यावर केलेली थोडी सुधारणा.....

शंकरराव धुंडिराज सदावर्ते.... रोशनव्हिला...ॲडव्होकेट, हायकोर्ट....

ते स्वत:शीच घोकतही असतील केव्हांतरी, त्यानीच लिहून घेतलं होतं ना..!...रसिक असावेत..

"रोशनी" मुंबेत कॉलेजात असतांना भेटलेली मेत्रिण...फ़ार जवळिक करू दिली नाही तिने तरी तिच्या नांवाची आठवण ठेवावी असे कांही क्षण एकत्र घालवलेले, कॉफ़ी प्यायच्या निमित्ताने! तेव्हांची त्यांची कॉफ़िची संवय अजून टिकून होती..

वडिलांच्या धाकाने लपूनछपून केलेल्या पण पुढे जाऊ न शकलेल्या थोड्याफ़ार रंगेलपणाची ही अशी भरपाई, नांवातच संपलेली!

आता कुठे असते रोशनी, कुणास ठाऊक! हायकोर्टात भेटण्याचा योग नव्हताच..कारण तिने सनद घेतली नव्हती..

सेंट्रल बेंकेत घुसली, म्हणे.!.पारशीण होती ना!

गतसाली कुंपणात मुंडी घालून घुसू पहाणाऱ्या वाटचुकल्या रेड्याने बोर्डाच्या एका पायावर शिंग मारून जायबंदी केलेला..तो सरळ करायला वकिलांना अजून संवड झाली नव्हती..

खरं तर शंकरनिवास किंवा भागिरथी सदन सारखं गांवाला नि वकिलांच्या नांवालाही आणि मुख्य म्हणजे घराच्या त्या अवतारालाही शोभणारं एखादं नांव सदूकाकाला सुचलं असतं कि.. ते राह्यलंच पण तो नेहमी त्या पाटीकडे कुत्सित नजरेने बघून हंसायचा, का ते कोणालाच कळायचं नाही!..

थोरल्या भावाच्या शिक्षणावरून मत्सर वाटत असेल..असं सगळ्यांना वाटायचं..

सदाशिव, लग्नाशिवाय राह्यलेला वकिलांचा चाळीशी उलटलेला भाऊ.. परगांवात रहायला लागेल म्हणून त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्याला शेती संभाळायला घरीच ठेवलं..तो राग मनात राहून गेला असावा.....

"एक शिकलाय ते पुरे..तूही गेलास शहरात तर शेतं आहेत कोणासाठी..? "

...

हायकोर्ट..लिहिलं असलं तरी काम करत होते ते, जिल्हा सत्र न्यायालयातच..

कज्जे केसेस फ़ारशा नसायच्याच..घरगुती वादातून उद्भवलेले फ़ौजदारी गुन्हे, पोलिसकेस वगैरे. आणि जमिनीचे दिवाणी कज्जे पंचायतीत मांडवली करून मिटवले जायचे..ही परंपरा सरपंच असतांना आबा देशमुखानी घालून दिलेली..

ॲफ़िडेविट नि नोटरीची कामं मात्र करायचे..

म्हणून तर वकिलसाहेब असे आरामात झोपाळ्यावर बसून झुलत पान खायचे..पन्नाशीत आल्यावर दगदग नकोच असे..वडिलार्जित शेती होती, धान्य होतं नि वाटेकरी मात्र नव्हते..एकट्या सदाशिवा-शिवाय.. तोही लग्नाचा राह्यलेला..का ते तोच जाणे.. वारस म्हणावा तर तोही दत्तक..मधू..

असंही वडिलांच्या मागे जबाबदारी घेणारं कोणी उरलंच नव्हतं..!

एका पायरीच्या उंचीवर लांबलचक पडवी,..लाकडी रेजे काढून रोशनव्हिला ह्या नांवाला साजेशी ग्रील लावलेली..

हे मात्र सदाशिवाय दुसऱ्या कोणालाच सुचलं नव्हतं गांवात! मधोमध दोन पायऱ्यांची ओटी, दोहो बाजूना खोल्या असलेली..पडवीत डावीकडे समोरासमोर दोन बाकडी, पक्षकारांना, आल्या गेल्या कुळांना बसण्यासाठी..उजवीकडे झोपाळा, ज्यावर स्वत: वकिलसाहेब नेहमी विराजमान असत, आपल्या पानाच्या डब्यासह..दोन पायऱ्यांच्या वर मधल्या ओटीवर डेस्काजवळ दिवसा कोर्टाच्या फ़ाईलची दप्तरं घेऊन बसलेला कारकून श्रीपती, अधून मधून कुळांचेही हिशेब ठेवायचा नि घरातल्या खाजगीकडच्या खर्चाचाही!

म्हणजे असं त्याला स्वत: वकिलसाहेबच सांगत असत..

" श्रीपतराव, घरात खाजगीकडचा खर्च वाढला बरं का..आत सांगा, म्हणावं गंगाजळी आटत चाललेय..अजून युवराजांचं शिक्षण व्हायचंय '

ते बहुदा स्वत:ला संस्थानिक समजत असावेत!.तरुणपणी, वडिल लवकर गेल्यावर वकिली शिक्षण पूर्ण होईपर्यंत कुठल्याशा

संस्थानात लेखनिक म्हणून काम करत होते..त्यामुळे घरी बायकोलाही अहो म्हणून हांक मारायचे....

...संध्याकाळी क्रिकेट खेळून दमलेला मधू कंटाळून का होईना पण मामीच्या धाकाने परवचा म्हणून झाल्यावर रात्री त्याच डेस्कावर दहावीचा अभ्यास करायला बसायचा.., पुस्तकात काकाने नुकताच आणलेला मोबाईल दडवून सिनेमे बघायचा..ते रात्री माडीवर झोपतांना. काकाला गंडवून..!

इथे स्वयंपाकघरातून त्याला जेवायसाठी चंद्रीमामी हाकारे देत रहायची मधेच डोक्यावरच्या खिडकीची झडप उघडून डोकवायची..ते त्याला एकदम 'डेंजर' वाटायचं..

तालुक्यात कॉलेजला जायचंय म्हणून तो आतापासूनच इंग्रजी शब्द वापरायला लागला होता...!

काका मात्र गालातल्या गालात हंसायचा. त्याला हे सगळं माहित होतं..सारखा तालुक्याला जायचा ना..!

बदलून येणाऱ्या तहसील कचेरीतल्यां बहुतेकांशी त्याची घसट असायची..

शंकरराव म्हणजे वकिलसाहेब नि त्यांचं कुटुंब (असा ते नेहमीच उल्लेख करत..) बहुतेक रात्री उशिरा माजघरातल्याच त्या डायनिंग

टेबलवर बसून जेवत, क्वाचित घरात असलाच तर सदाशिव सोबतीला असे.

...शंकररावांचा ब्रम्हचारी भाऊ..!

सगळ्यांना वाढायला असायची चंद्रीमामी..पण उशिरा गांवगप्पा करून आल्यावर चाळीशी उलटलेला नि एकटा राह्यलेला सदाशिव स्वत:च वाढून घ्यायचा..

त्याला चंद्रिमामी समोर नको असे..बोलणं फ़ारसं नसेच, फ़क्त खाणाखुणांची भाषा..

ही मामी होती पहिल्या गॊरबाईंची दूरची निराश्रित भावजय.. तरुण वयात मागे आलेली..तिचं मधुवर लक्ष असे..तिच्याच देखरेखीत वाढत होता तो..आताच्या गॊरबाई म्हणजे मधुची दुसरी आई तो लहान असतांना आली असली तरी मधू होता चंद्रीमामीच्याच मांडीवर. ती आली होती पहिल्या गॊरबाईच्या बाळंतपणासाठी..ती आली नि आयत्यावेळी ठरवून गॊरबाई माहेरी निघून गेल्या त्या परतल्याच नाहीत..का ते कधीच कोणाला कळलं नाही...सदाशिवाला अंदाज असावा..! श्रीपतीजवळ उताराचे पॆसे देऊन वकिलसाहेब गप्प बसलेले.

मामी म्हणाली सुद्धा..." वन्संना तिकडे बाळंतपणाला जायचं होतं तर मला इकडे कशाला आणलेनी..गोळाभर भात खायचा तो तिथेच खाल्ला असता कि..'

हे फ़क्त म्हणण्यासाठीच.. मागे आलेली निराधार घारीगोरी भावजय तिकडे त्यानाही जोखीम वाटत असणार!

थोरल्या गोरबाईंना आराम मिळावा म्हणून खुद्द वकिलांनीच सासूच्या परवानगीने आणलेली!

मग वकिलांच्या नि सदाच्या जेवणाच्या सोयीसाठी राह्यली, ती इथलीच झाली..!

गोरबाई माहेरी रवाना झाल्या त्या परतल्याच नाहीत कारण त्यांचं अपुऱ्या दिवसाचं बाळ गेलं नि त्या भ्रमिष्ट झाल्या..!

त्यांना कसला संशय होता त्याच जाणोत..नवऱ्याबद्दल असंबद्ध बडबडायच्या!.

मग तर वकिलांना संधीच मिळाली..त्यानी बाईना टाकलं!

कोणा अशिलाच्या नात्यातली गरिबाची, वयात बरंच अंतर असलेली मुलगी दुसऱ्या गोरबाई होऊन आली तरी खाजगीकडच्या किल्ल्यांचा जुडगा मामीच्या कमरेलाच लटकलेला राह्यला....मामी "'मामीच " राह्यली.. जबाबदार व्यक्ति होऊन..!

आतासुद्धा सगळ्यांची जेवणं नि घरातलं सगळं आटोपल्यावर स्वयंपाक घरातच चंद्रीमामीचं जेवण सावकाश रवंथ करत चालायचं..

पहिल्या गोरबाई माहेरी गेल्यापास्नं मामीची दूध तुपाची चंगळ असायची..

पडवीत झोपाळ्यामागे बंगला ह्या संज्ञेशी विसंगत वाटणारं धान्याचं कोठार होतं म्हणजे असं म्हटलेलं वकिलांना आवडायचं, मात्र होतं ते वर उचलून उघडायच्या लाकडी झडपा लावलेला भिंतीलाच जोडून केलेला लाकडी पेटारा..

झोपाळ्यावर ओटीच्या उजव्या बाजूच्या खोलीची खिडकी ज्यातून तरुण गोरबाई एक झडप उघडून पति राजांना खुणेनी कॉफ़िसाठी बोलवायच्या..

हे सगळं तो किल्ल्यांचा जुडगा मामीकडून हस्तगत करायसाठी.. असं श्रीपतीला नि सदाकाकाला वाटत होतं..सदाकाका तिच्याशी बोलायचा नाही, त्याचा वावर ती आगरात असेल तेव्हांच..पण श्रीपती जातायेता मामीला आवाज द्यायचा..

पंक्तिला असायचा ना दुपारच्या..काका असला कि त्याच्याबरोबर श्रीपतीच्या भाताच्या मुदीवर तुपाची धार पडायचीच..काकाकडे बघून श्रीपती हळूच छद्मी हंसायचा ते मामीला कळायचं.....

मधेच श्रीपतीला काम सांगायची..खाजगीकडचं म्हणजे घरातलं सामान आणायला..

'श्रीपतराव, यंदा चांगल्या प्रतिची गुळाची ढेप आणून टाका..जुना चिघळतोय नि कोठीच्या खोलीत जाऊ नये एवढे डोंगळे झालेत.."

कॉफ़िचं प्रकरण म्हटलं तर गुपित, पण घरातल्यानाच नव्हे तर आल्यागेल्यालाही माहित असावं..ते मुद्दाम मागवलेली परदेशी कॉफ़ी प्यायचे म्हणे..

मग इतर कुणाचं लक्ष जाऊ नये म्हणून वकिल जरा मोठ्याने आवाज द्यायचे..

'श्रीपतराव, सदाशिव शेतावरनं आला कि उद्या गडी सांगून हे कोठार आधी साफ़सूफ़ करून घ्या म्हणावं...सारखे उंदिर खुडबुडताहेतसं वाटत रहातं.."

आणि ते आढ्यातलं चिमणीचं घरटं काढून टाका...सारखी ये जा करत रहातात पांखरं.."

"चांगलंय कि मग! तेवढीच घरात जाग रहाते!"

"सांगितलंय तेवढं करा.. सल्ले देऊ नका.."

ह्यावर खिडकीतून फ़िस्कारल्यासारखा हंसण्याचा आवाज आला नि..बुडाला जोर लावून पायांना रेटा देत झोका घेत वकिल बोलते झाले, बहुतेक स्वत:शीच...आज पक्षकार नव्हते ना!,

"नसतातच अलिकडे कोणी..लोकं हुशार झालीयेत, परस्पर मांडवली करायला..आणि कुळांच्या भानगडी सदू परस्पर निस्तरतोय बाहेरच. वर घरात मामीला चहाची ऑर्डर देतांना, मामीकडे बघून हळूच डावा डोळा बारिक का करायचा केव्हांतरी, तोच जाणे! ती चहा करतेच, पण गोबरगॅसच्या शेगडीवर, मागच्या पडवीत..वकिलांच्या भाषेत "आऊटहाऊस मधे.."'

केवढंतरी लांबलचक स्वगत झाल्यावर श्रीपतीकडे बघायचे..उत्तरादाखल! त्याला खोच माहित होती..

'मालक, सदूकाका तालुक्याला गेलेत ना कालच, त्यांचं ते मोबाईलचं कायतरी काम आहे..इथे नेटवर्क मिळत नाही तरी मोबाईल हवाच त्यांना! आगरात जाऊन कायतरी बघत बसतात..आणि हो, आता कोठारात भातच राह्यलं नाय तर उंदिर खातील काय? अलिकडेच तर मधूभटाच्या चक्कीवरनं तांदूळ करून आणलेत. चार महिने खायचेत पुरवून.. पुढच्या सीझनचं..भात येईपर्यंत..नाहीतर मग आमच्यासारख्या नोकरमाणसांना आहेच रेशनच्या तांदूळाचा भात..!'

'तो तरी मिळतो ना वेळेला..? पण आधी त्या उंद्रांना हुसकवा बघू, नाही तर त्यांच्या पाठनं एखादं लांबडं जनावर यायचं घरात..गतसाली आलंवतं तसं..!'

' ते पण घाबरेल आत यायला, आपल्या अशिलांसारखंच..! " एक अलगद्सा टोमणा....

जिवावर आलं असलं तरी हातातला शिळा पेपर झोपाळ्यावरच झटकून एकदाचं बूड हललं..नि उठतांना त्यांचं लक्ष गेलं. खिडकीची झडप हलली नि हातांच्या इशाऱ्याबरोबर कांकणं किणकिणली! शंकररावांनी कारकुनाच्या डोक्यावरचं घड्याळ पाह्यलं नि चक्रावले...

आज सुटीचा वार, कोर्टच काय सगळंच बंद..नि तरी कॉफ़ी? तीही सकाळच्या अकरा वाजता..? बाईंचा मूड बराय म्हणायचा...पण

त्या लोळत पडलेल्या मधूला उठवून बाहेर घालवला तरच आपण आत जाणार ना!

हा पोर त्या चंद्रीमामीच्या सांगण्यावरून मुद्दाम माडीवरून खाली येऊन माजघरात झोपत असावा, "आपल्याला डिस्टर्ब करायसाठी " असं त्यांना उगीच वाटून गेलं..

'श्रीपती, मधू उतरला का माडीवरनं खाली? "

हे अर्धवट घरात बघत...

"गेलासुद्धा असेल तो क्रिकेट खेळायला...आज रविवार ना..!"

"चला, आता मात्र उठावंच लागणार "..

'श्रीपती, मागच्या पडवीतल्या गॅसवरचा चहा गरम करून घे जराशाने. मामीने ठेवला असेल बघ...सदा नाहियॅ ना आज.."

एकाच वेळी दोघांना चिमटा! वकिल होते ना!

"राजा उदार झाला.. आपण चालले..इम्पोर्टेड कॉफ़ि प्यायला!" हे श्रीपतीचं स्वगत..

माजघरात पाऊल टाकतांना काकणं किणकिणल्याचा आवाज त्यांच्या कानावर पडला..गॊरबाई कॉफ़ीचा कप घेऊन उभ्या...त्या लाजत होत्या हे शंकररावांना माजघराच्या अंधारातही दिसलं..म्हणजे मधू घरात नाहीये ह्याची खात्री करून ते आपल्या खोलीत गेले..पाठोपाठ बाईसुद्धा..

लग्नाला दहा वर्ष होत आली तरी नव्या नवरीचं लाजणं संपत नव्हतं..

अशाने मामीच्या कनवटीच्या किल्ल्या कशा हस्तगत होणार...आणि दहा वर्षात मधूला एकतरी भावंड व्हावं तर तेही नाही..फ़क्त शंकररावाची गरज भागत होती.!.' हे चालले ती इम्पोर्टेड कॉफ़ी प्यायला, बाटली मात्र नेसकॉफ़ीची दिसायची...!

चला, आपण आपले पुढच्या आठवड्यातल्या तालुक्याच्या केशींचे पेपर फ़ायलीतनं लावून ठेवावेत..नि सटकावं..काका नाहीये पंक्तिला, म्हणजे कांही खास नसणार जेवायला...वास तरी नाय आला..'

पक्षकारांच्या बाकड्यांमागची डावीकडची कायमची बंद खिडकी...स्वयंपाक घराची.

पक्षकारांना घरातला मेनू समजेल असे वास मात्र येत असावेत..

तिकडे चंद्रीमामीचा वावर..ही गौरबाईंच्या थोरल्या सवतीची मागे आलेली दूरची भावजय. घारीगोरी विधवा मामी घरावर राज्य करत असल्यागत नोकरांना तोरा दाखवत असे..

मधूच काय वकिलसाहेबही तिला मामी म्हणायचे..

अगदी तरूण नाही पण वयस्करही नव्हती वाटत..त्या मानाने गौरबाई म्हणजे नव्या वहिनीसाहेब, साहेबांपेक्षा लहान वाटायच्या.. नव्या म्हणजे झाली असतील दहाएक वर्ष..थोरल्या गौरबाई गेल्यावर वकिलांनी आळंदीला लग्न करून आणलेली गरिबाची लेक..रूप बरं

म्हणू ह्यांनी आणि पॅसा, जमिनजुमला बघून तिच्या बापाने लग्न लावून दिलं..

तीसुद्धा सवतीचंच नांव घेऊन रितसर माप ओलांडून आली तेव्हां मधू अवघा तीनेक वर्षांचाच होता..त्याला चंद्रीमामी संभाळायची..

हळू हळू नव्या आईचीही संवय झाली..पण तिला जरा अवघडल्यागत झालं..चाळीशीजवळ आलेले वकिल नि वाढल्या वयाची म्हणून राह्यलेली, मंगळ असलेली पंचवीशी उलट्लेली गरीबाची मुलगी..संसार तर सुरू झाला पण पोटी लेकरू कांही झालं नाहीच..वकिलसाहेब प्रेमाने वागवायचे एवढंच..पण तेही रात्री. दिवसा फ़क्त कॉफ़ीचा उष्टा घोट...

दिवसा सगळा मामीचा कारभार..म्हणून मग हे अकरा वाजताच्या नि संध्याकाळच्या कॉफ़ीचं निमित्त..

गालांना हात लावून टिचकी मारल्यागत केलं कि गॊरबाई खूष..अशावेळी स्वयंपाकघरात मामी भांडं वाजवायची..

हा वकिलांना इशारा असायचा, मधू घरात असल्याचा..

कारकुनाच्या पाठीमागच्या भिंतीवर लोकमान्यांचा ती विशिष्ट पगडी घातलेला मोठा फ़ोटो, चंदनाच्या हारासहित..जो पुण्यतिथीला बदलला जायचा..

आणि शेजारी तीर्थरुपांचा! म्हणजे कोकणस्थी घाऱ्या धुंडिराज केशव सदावर्ते ह्यांचा डोक्याला रुमाल बांधलेला थोडा लहान फ़ोटो..

मधल्या भल्याथोरल्या फ़डताळवजा कोनाड्यात वर अर्धी खिडकी..ही बायामाणसांना ओटीवर डोकवायसाठी असावी..आणि खाली कधीमधी वाजणारा छोटा रेडिओ..सदूकाकांने लावला तर चुकून आवाज येणारा..

त्याआधी म्हणे तिथे ग्रामोफ़ोन होता, रेकॉर्डमधे पिन अडकून सतत एकच ओळ परत परत वाजवणारा... तेव्हांच्या टोपपदरी आज्यांना आवडणारी भजनं किंवा फ़ारतर लताबाईंच्या कोवळ्या आवाजातलं गंगायमुना डोळ्यात उभ्या का..हे भावगीत ऐकवायचा.. सदाकाका तेव्हां लहान होता असणार; मुद्दाम पिन अडकवून पुन्हापुन्हा वाजलेलं एकून टाळ्या पिटणारा...

मधू वकिलांचा दत्तक मुलगा..मामीचाच दत्तक घेतलेला.हे मधूला माहित नव्हतं, तरी मोठा झाल्यावर ते कळलंच!..

ती आल्यापासून मामीच होती..सगळ्यांची..मुद्दाम कळू दिलं नाही तरी तिला मामीच म्हणायचं हे मात्र त्याला आपोआपच कळालं, सदूकाकामुळे!

सदूकाकांने शिक्षणासाठी तालुक्याला जाऊन उमेदवारी केली तेव्हां झालेल्या प्रेमभंगामुळे लग्नच केलं नाही.

असं लोकं म्हणत पण खरं तर त्याला मुलीच सांगून आल्या नाहीत!आणि पुढे...त्यालाही गरज वाटली नसावी!!

दात पुढे असलेल्या थोरल्या गॊरबाई..वकिलांना मुळातच फ़ारशा आवडत नव्हत्या..

लेकरू गेल्यामुळे भ्रमिष्ट झालेल्या गॊरबाईंना 'टाकायला " त्यांना निमित्त मिळालं..!

नि ह्या लहानखुऱ्या दुसऱ्या गॊरबाई आल्या..आळंदीहून लग्न लावून..!

सगळं ठीकठाक सुरू असतांना अचानक मामी निघून गेली..जातांना मधूच्या डोक्यावर हात फ़िरवून रडली! का ते कळलं नाही..कोणालाच, अगदी मधूलाही!

जातांना किल्ल्यांचा जुडगा मात्र नव्या गॊरबाईंच्या हाती देऊन गेली..

पाठोपाठ म्हणावं तसा सदूकाकाही न सांगता गायब झाला पण त्याचं कांही वाटलं नाही..असं पूर्वी झालेलं, तेव्हां वकिलांच्या अशिलाकडून त्यांना सदूला कुठेकुठे पाह्यल्याचं कळे..कसल्या व्यसनात अडकला म्हणावं तर अचानक प्रकट व्हायचा..

तेव्हां मामी जरा कासावीस व्हायची असं श्रीपतीला वाटायचं..तो सदाकडे बघून डोळे मिचकवायचा..

" ही मामी लेकराला टाकून कुठे गेली असेल..?" वकिलसाहेब स्वत:लाच प्रश्न विचारायचे..धाकट्या गॊरबाई हंसून मान वेळावायच्या..

"जसं कांही माहितच नाही, स्वारीला!.भाऊसुद्धा गायब होतोय अधनंमधनं...!"

'पण तेव्हां मामी इथेच असायची ना...आता त्या मागे सोडलेल्या दरिद्री माहेराशी काय देणंघेणं..चौकशी करावी तर....."

ते वाक्य अर्धवट सोडून कॉफ़िचा घोट घ्यायचे..

'नकाच करू चौकशी..नको ते ऐकायला लागेल.."

वकिल होते, त्यांना मतितार्थ कळत असेल ना..

'तसलं कांही नसेल..एक मुलाची आई अशी लेकरू टाकून जाईल का.."

"लेकराच्या बापाला भेटावंसं वाटलं असेल..! "

" तो कुठे राह्यलाय आता.."

भोळसट वाटणाऱ्या बाई छद्मी हंसू शकतात हे वकिलांना तेव्हां पहिल्यांदाच समजलं..!

हे सगळं अर्थात मधूच्या अपरोक्ष..मामी गेली तशी पुन्हा हजर झाली, पण किल्ल्यांचा जुडगा तिने परत मागितला नाही!

आणि मागितला असता तरी गौरबाईंनी दिला नसता..त्यांनी तो शंकररावांच्या हवाली केला होता..! त्यांना अचंबा वाटला..!

आणि मग सदाशिव हजर झाला..भावाच्या नांवाच्या रोशनव्हिला ह्या बोर्डाकडे बघून कुत्सित हंसणारा सदाशिव, न बोलता सरळ शेतघराकडे रहायला गेला..

गौरबाईनी सुस्कारा सोडला. सवतीचा असला तरी वारस आहे म्हणून.. तसाच मामीनेही...सदाचा आगरातला पाठलाग टळेल म्हणून..

एका दूरच्या अशिलाला त्याच्या नातलगाकडून कळलेलं त्याने खाजगीत वकिलांना सांगितलं..

वकिलसाहेबांची काडीमोड घेतलेली भ्रमिष्ट बायको आता अचानक झोपेतनं उठल्यागत शहाणी झालीय..

वकिलसाहेब कल्पनेत चित्र रंगवू शकत होते...कोर्टरूमसारखं!

" मूल नाही म्हणून इकडून मला टाकलेनी तरी संभाळताहेत माझंच लेकरू..गेलं ते त्या सटव्या मामीचं..नवरा परागंदा झालेला नि ही दारोदार हिंडतेय..आसरा मागत..आईने नात्यातली म्हणून ठेवून घेतली मदतीला तर हिचे हे पराक्रम....

माझं बाळंतपण करायला आलेली ही चवचाल बाई आपलं वाढवलेलं पोट पाडून

अपुऱ्या दिवसाचं टाकून गेली..तेही सदाशिवाला कळू न देता !

वात झालेल्या मला ह्यांनी टाकलेनी तेव्हां लेकराचे हाल नको म्हणून आईनेच लेकरू तिच्या हाती सोपवून बापाकडे पोहोचतं करवलं...वेडा सदा ते आपलं समजून माया करत राह्यला असेल....

आणि मला वेडं ठरवणारे वकिल स्वत:च्याच मुलाला दत्तक घेऊन मोकळे झाले!

वकिली करणारा माणूसही एवढा मूर्ख असू शकतो ह्यावर विश्वास नाही बसणार कुणाचा..पण हे सत्य आहे..

मामीने किती जणांना फ़सवलंय नि आपण बसलेय राज्य करत..असो..मला एकदा लेकराला बघायचंय.."

झोपेतनं जाग आली तरी काळाचं भान नव्हतंच..एवढी वर्ष मधे गेल्याचं तिच्या गांवीच नव्हतं..

तिला अजून ते बारकं लेकरूच आठवत होतं बहुतेक..!

वकिलसाहेबही ऎकून सुन्न झालेले..आता दत्तक मुलाची आई म्हणून तरी मामीला ठेवावंच लागणार!..

मामीला तिच्या माणसांकडून हे कळलं,तेव्हां वेडीच्या तोंडून बोभाट झाला असता म्हणून गेली होती अंथरुणावर मरायला टेकलेल्या आयशीला विचारायला..

."हे कसं कळलं तिला? तू खबरदारी घेतली होतीस ना?" आयशीला मान हलवायची सुद्धा ताकद उरली नव्हती..

" अगो तिच्या मदतीला वकिलानी तुला नेलेनीत मला सांगून; पण तू त्या सदाशिवाबरोबर उद्योन करून पोट पाडायला आलीस तेव्हांच ती नेमकी बाळंत झाली आरोग्यकेंद्रात..तिथली डॊक्टरीण सुटीवर..कळा देतांना बेभान होऊन ती बेशुद्ध झाली तेवढ्यात मी सुईणीला पॆसे देऊन तिचं पोर तुझ्या कुशीत ठेवलं..नि तुझं पाडलेलं तिला दाखवलं..तेव्हांच तर तिला ते बघून झटका बसला.."

वकिल जांवयाला घाबरणारी तिची आईस एकटीच होती..!

कष्टाला माणूस हवं म्हणून सासऱ्यानी गॊरबाईला करून घेतली होती. तरी तिच्या नवऱ्याला ती आवडत नव्हतीच..त्यात हे पोर जाण्याचं कारण घडलं !

...आणि वकिल शहरात आधी कुठे गुंतले होते म्हणे पूर्वी! ते रोशन का काय नांव ठेवलंय ना; बंगल्याचं? तिच्याकडे त्यांचा कल होता असणार....

पण एकेक विपरीतच घडत गेलं...त्यात तुला दुर्बुद्धी झाली त्या सदाच्या मागे लागायची..आता परतीचं दार बंद करून आलीयेस ना..?

"नाही, बोलले नाही कांहीच..कांही घडलंच नाही. अशी जाऊन उभी रहात पुढ्यात..त्या पोराला तरी नक्कीच माझी संवय झालीय.."

तिकडे सदाशिवने मामीच्या पाठोपाठ वकिलसाहेबांच्या सासुरवाडी जाऊन वेडीची काय समजूत घातली कोण जाणे..आता एकटीच असलेल्या म्हातारीजवळ

वहिनीच्या ऑषध पाण्याला पॅसे देऊन आला..

आल तो एकदम विरक्त झाल्यासारखा शेतघरात निघून गेला..आपलं वाटत होतं ते आपलं नव्हतंच हे कळल्यावर त्यालाही झटका बसलाच..

सायकल फ़ाटकाबाहेर काढतांना ज्याच्या यशाचा उगाच दुस्वास केला त्या थोरल्या भावाच्या नांवाकडे बघून त्याच्या लक्षात आलं, थोरलाही अपयशीच होता..!

भरल्या डोळ्यांनी ' बंगल्याकडे " बघतांना भावाच्या त्या अनाम प्रेमाला सलाम करावसं वाटलं...पण नुसतं पुटपुटला... रोशनव्हिला.....!!

*****

|| फ़ॅमिली ||

गल्लीच्या टोकाला चालू असलेल्या बिल्डिंगच्या बांधकामाच्या पायलिंगची मशीन वाजायला लागली तशी टेरेसमधल्या शोभेच्या झाडांना जुन्या कपाच्या मापाने थोडथोडं पाणी घालणारी शिरिन भानावर आली. टेरेस म्हणजे खालच्या व्हरांडयाच्या वर असलेली मोकळी जागा. म्हटलं तर बाल्कनीच. तिथूनच तिच्या घरात जाता येत होतं. शिरिन तिला टेरेस म्हणायची. कारण तिच्यावर छप्पर नव्हतं. फक्त तिच्या घरात जाण्याच्या दरवाजावर शेड होती.

गेल्या कांही दिवसात झाडांना पाणी घालण्याची गरजच नव्हती. सरत्या पावसाची झड यायचीच. पण गेले दोन तीन दिवस पाऊस राहो लख्ख ऊन पडलेलं. झाडं सुकायला लागलेली म्हणून ती रोजचं काम करत होती. पण..

पण त्या मशीनच्या खडखडामुळे उशीर झाल्याचं तिच्या लक्षात आलं. अजून बरीच कामं व्हायची होती. तिच्या फ़लोरिस्ट शॉपवर जायला निघतांना लागणाऱ्या वस्तू तिने आधीच काढून ठेवल्या होत्या. पण क्रोसकट करून पाणी बदलून ठेवलेल्या ग्लॅडिलस नि रजनीगंधाच्या काडया गरम पाण्यात सील करायच्या होत्या. त्यांच्या कळया उमलायला लागल्या होत्या.

भिषोन नांवाचा बंगाली पोर सकाळीच आल्या आल्या बुके बनवायला घेईल त्यात वापराच्या होत्या. आणखी उशीर झाला तर तो त्याने आणलेला ताजा माल वापरून टाकील.

'गेल्या गेल्या त्याच्याकडे असलेली दुकानाची डुप्लिकेट चावी न विसरता परत घ्यायला हवी. रात्री शॉप बंद करतांना मिलिंदला लागेल. तो सकाळी शॉप उघडून चावी देऊन जातो. काय काय लक्षात ठेवणार. ही दोन पोरं मात्र कायम उपयोगाची. ती आहेत म्हणून जमतंय सगळं. त्याना जपलंच पाहिजे.'

हा भिषोन खरं तर बांगलादेशी. व्हाया कलकत्ता मुबईत येऊन पोहोचलेला. होता मात्र आर्टिस्ट.भिंतीवर लटकवायला फर्न किंवा पामच्या बॅकग्राउन्डवरची फुलांची बघत रहावी अशी रचना करायचा. कांही चांगलं बघितलं तर लगेच 'बेशी भालो' किंवा एकदम 'भिषोन भालो' म्हणून चित्कारायचा. त्यामुळे मिलिंद आणि तिने मिळून त्याचं नांवच भिषोनबाबू असं ठेवलं होतं. ते बिभिषण आहे असं इतरांना वाटायचं!

विचारांच्या तंद्रित असतानाच तिला खालून जोसेफची हाक ऐकू आली. 'शिरिन कॅन यू गेट मि अ कप ऑफ टी प्लिज? माय मेड हॅजन्ट कम येट. '

'येस डिअर..आय ॲम कमिंग. '

गेल्या वर्षी आन्टी नेन्सी गेल्यापासून बिचारा एकटा पडला होता. उठल्याउठल्या हाताने चहा करून घेण्याचा कंटाळा येणारच. चहा तयार होता. पण खरं तर तिचाच चहा अजून व्हायचा होता. रूस्तमला दिल्याशिवाय म्हणजे हॉलमधे त्याच्या फोटोपुढे कप ठेवल्याशिवाय ती पीत नसे. तो गेल्यापासूनचा तिचा हा शिरस्ता होता. त्यातून फ्रिजमधे अंडी नसल्यामुळे नुसता ब्रेडच खावा लागणार. ती मग लगबगीने आत गेली. पटकन दोन कप घेऊन आली. एक रूस्तमच्या फोटोपुढे ठेवतांना नेहमीसारखं हंसून म्हणाली. 'सॉरी जानू.. आजे मोडू थयूँ.. माफ करीस ने? '

मग तिथल्या मार्बलटॉपच्या जुन्या कॉफिटेबलवर बसून स्वत: ब्रेड खात चहा प्यायली. तेव्हां साखर कमी असल्याच तिच्या लक्षात आलं. तिला क्षणभर भास झाला; आता रूस्तम म्हणेल...

'केम जाना? मारी चाय चिनीकम बनावेली तने...'

खरं तर रूस्तमला डायबेटिस होता म्हणून ती त्याच्या फोटोपुढेसुद्धा कमी साखरेचा चहा ठेवायची!

तिला वाटलं आता तो फोटोमधूनच विचारेल कि 'आजे बपोरे वेल्ला आवीस ने? बन्ने साथेज बोनू खवानू..'

'हां रे. चोक्कस.. पर माफ करजो हा के.. फ्रिजमा धनसाक मुकेलू छे. एज राईससाथे खाऊ पडे. चालसे ना? '

तो कांही म्हणेल ही केवळ कल्पनाही तिला सुखावून गेली.. हे सारं आठवून ती स्वत:शीच हंसली..मग सगळं आवरून कुलूप लावून

खाली उतरली तो व्हरांडयातच तिचा लॅन्डलॉर्ड जोसेफ तिची वाट पहात होता.

'गुड मॉर्निंग जो. आय ॲम लेट. ' ती त्याला नुसतंच 'जो' म्हणायची. गेल्यावर्षीच वारलेल्या त्याच्या बायकोसारखं. ती असल्यापासूनच.

'नथिंग गुड अबाऊट धिस मॉर्निंग. दॅट स्टुपिड मेड..' तो एवढं बोलतोय तो ती मेड समोर हजर.

'देअर शी कम्स. ' शिरिन बोलली. 'ॲन्ड नॉट टू वरी डिअर. आय विल गेट समथिंग फ़ॉर यू..'

'काय सायब. मागला दरवाजा बंद करून ठेवला. मंग फुडून यायाला पडलं. '

'मंग तेसाटना लेट जाला काय?' असं म्हणत जोसेफ नि त्याच्यामागून; मेनडोअरला बाहेर असलेलं जुन्या पद्धतिचं स्प्रिंगवालं अर्ध झुलतं दार ढकलून शिरिन आत गेली. पाठोपाठ मेड नि मग व्हरांडयात 'जो'च्या पुढयातच बसून असलेला मोसे हा त्याचा राखणदार कुत्राही त्या झुलत्या दाराच्या खालून आत शिरला; शेपूट हलवीत. त्यालाही कळलं कि आता आपल्याला ब्रेड मिळणार. भूक सगळयांना सारखीच. पाळलेले असले तरी त्या प्राण्यांनाही.

टेबलावर चहाची किटली नि तिथल्याच फ़्लॉवर पॉटमधे आधीच्या काढून ताज्या फुलांच्या दोन दोन काडया लावून ठेवताना मागून आत आलेल्या मेडला शिरिन म्हणाली ;

'ममताबाय, साबला चा दे.. ना पछी हे फ़्लॉवर पॉटचा पानी बदली कर हां के.. '

'डोन्ट टेल हर. शी विल ब्रेक द वाज. ' जोसेफ बोलला..

'मंगसून माजी फ्रिजमधसून ते धनसाक घेव्न साबला गरम करून दे ब्रेडसंगती खायाला..

घराचा चाबी साबजवल हाय. मंगशी माजाबी घर साफ करून ठेव. हूँ बपोरे आवीस.'

'कम मोसे; हॅव यूअर ब्रेड..' तिने कुत्रयाकडे मोर्चा वळवला..

कुत्रयाची सोय झाल्यावर मग पायात घोटाळणाऱ्या मांजरीच्या जरा मोठया झालेल्या पिलांना थोपटत म्हणाली..

'ममताबाय, आनि किचनसून ते सॉसर आन ने.. हे बच्चेलोकला दूध देयाचा हाय..'

तिच्या सूचना संपतच नव्हत्या!

'डोन्ट पॅम्पर देम. ' सोफ़यात बसता बसता जोसेफ तिला म्हणाला.

त्याला मांजरांचा राग होता हे शिरिनला माहित होतं. आन्टी असतांना एकदा मांजरीने फिशटँक पाडून मासे मटकावल्यावर जोसेफने मांजरीला हांकलून दिलं होतं. म्हणजे अक्षरश: उचलून फेकलं होतं!

पण आन्टी नॅन्सी मागच्या दाराने तिला आत घेई नि मासेवालीकडून मासे साफ करतांना काढून ठेवलेल्या मुंडया [1]शेपटया तिला खायला घाली. इतकी ती मांजर आन्टीच्या संवयीची होती. पुढे आंन्टी आजारी असतांना मांजरी सतत तिच्या बेडजवळ बसून रहायची नि मधेच 'म्याँव' करून आन्टीला जाग द्यायची. हे जेव्हां जोसेफने बघितलं तेव्हां मग तो हांकलायचा बंद झाला.

शिरिन पिलांना दूध पाजतेय एवढयात बाहेरून स्कूटरवर स्टेशनला जाणाऱ्या जॉनची हांक आली.

'हे.. जोसेफ..व्हेअर आर यू? '

'हे..गुड मॉर्निंग जॉन..' व्हरांडयात येत जोसेफ म्हणाला.

बारा महिने डोक्यावर स्पोर्टस् कॅप घालणारा हा कोणालाही न घाबरणारा जॉन मिस्किटा त्यांच्या गल्लीतल्या घरांच्या असोसिएशनचा सेक्रेटरी होता. क्लस्टर डेव्हलपमेन्टच्या नांवाखाली लोकांना धाक दाखवून तिथल्या गांवठाणात घुसू पहाणाऱ्या बिल्डरची पोलिस कम्प्लेन्ट करायसाठी सह्या गोळा करत होता. तो खरं तर ज्युनिअर पण वयस्कर जोसेफला नांवाने हांक मारायचा, आणि खिजवायसाठी कि काय, आन्टी नॅन्सीला मात्र मुद्दाम 'आन्टी' म्हणायचा..

'तुजे बोरे जातले माज्या पुता..' आन्टी त्याला तोंड भरून आशिर्वाद द्यायची....

ही जुनी गोष्ट आठवून शिरिन स्वत:शीच हंसली.

मांजरीच्या पिलांना दूध देताना तिच्या लक्षात आलं कि एक पिल्लू कमी आहे. शिवाय पिलं मोठी झाल्यामुळे कि काय ती मांजरी पण आता दोन दिवसात घरात फिरकली नव्हती.

'तीनच हाय.. एक बच्चा क्याँ गया?' ती स्वत:शीच बोलली.

तिला वाटलं.. 'ते पिल्लू आईला शोधायला गेलं कि काय? का आईच त्याला घेऊन गेली? '

'ममताबाय हे पोरेलोकची आय येत नाय काय इकरे?' शिरिनने मेडला विचारलं..

'काय म्हाईत बाय.. ती तिकडं मागल्या गल्लीतला कचरा विचकत बसत आसन. ती लोका कोलंबीची सालपटा टाकत्यात कवा कवा. त्येच खाऊन प्वाट भरत आसन तिचं. '

झाडू मारता मारता मेड बोलली.

मोसेने ब्रेड नि मांजरीच्या पिल्लानी बशीतलं दूध संपवलं. एक कमी झाल्यामुळे उरलेल्यांना जास्तच मिळालं असावं..

तोवर बाहेर दोघांच्या गप्पा रंगलेल्या पाहून तिला बरं वाटलं..

'जोसेफ आन्टीच्या जाण्याचं दु:ख विसरण्याच्याच प्रयत्नात आहे तर. बरंय्. '.. जॉनचाही तसाच प्रयत्न असावा...

तिला मग आठवलं कि..

'म्हणता म्हणता वर्ष होत आलं. गेल्या वर्षी बेन्ड्रा फिस्ट सुरू होण्यापूर्वीच आन्टी गेली नि माउन्टमेरीला मेणाचं हार्ट वहायची तिची इच्छा राहूनच गेली. बेडवरच असल्यामुळे सकाळच्या मासलाही जाऊ शकत नव्हती. जोसेफ फक्त एकदा जाऊन आला..

श्वास घेतांना दम लागायचा म्हणून आधी भाभाला गेली होती. जोसेफ लिलावतीला ॲडमिट करूया म्हणाला तर नाही म्हणाली. ॲन्जोग्राफीचा रिपोर्ट चांगला नव्हता..पण तिच्या मनाने घेतलं होतं कि खर्च करूनही एकदा ॲडमिट झाल्यावर घरी परतायची शक्यता नाहीच, ती सिच्युएशन टाळण्यासाठी मग वर्षभर आधी कार्डिओलॉजिस्टला कन्सल्ट करत होती. जोसेफ तिला रिक्षाने घेऊन जायचा.

शेवटी नाईलाजाने ॲन्जोप्लास्टी करावी लागली तेव्हां घरी आल्याआल्या शिरिनला बोलवून घेऊन म्हणाली..

‘नाऊ आय गॉट बोनस लाईफ. इट मे गेट ओव्हर एनीटाईम! ’

‘डोन्ट से दॅट, यूअर चिल्ड्रन विल कम टू सी यू. तुम ठीक हो जाएंगा....’

‘आय कान्ट वेट फ़ॉर देम.’

नाऊ यू प्रॉमिस मी? यू विल टेक केअर ऑफ जो..’

‘ऑफ़कोर्स आय विल. पर तुम अब्बीसे ऐसा क्यू बोलता. डोन्ट फ्राइटन्ड मी. रूस्तम गयापछी तुमीच था अमेरा सबकुछ. एव्हरीथिंग लाईक मदर, सिस्टर. लाईक फ़ेमिली!’

‘इसवास्तेच बोलता. हमारा दो काम करना. माऊन्टमेरीको वेक्सका हार्ट ऑफर करना और तुम बोलता वो ब्लेक डॉल लगा देना घरका भार..ॲटलीस्ट सम डेज् आय विल स्पेन्ड विथ ‘जो ‘ पीसफुली’..

इमोशनल झालेल्या जोसेफने मग उठून हॉलमधल्या मेरीच्या फोटोसमोर कॅन्डल लावली नि आपली रोझरी घेऊन तो बाहेर गेला..इझीचेअरवर.

ही गोष्ट पावसाच्या सुरवातीची. पुढे दोन अडीच महिन्यातच आन्टीने आपला बोनस पिरियड संपवला!

एकच तिच्या मनासारखं झालं, गेली तेव्हां स्वत:च्या घरातच होती. जोसेफजवळ!’..

बराच वेळ एका हाताने धरून ठेवलेलं झुलत्या दाराचं एक झडप सोडून देत शिरिन स्वत:शीच विचार करत राहयली....

‘म्हणजे आता रूस्तमलाही जाऊन अडीचतीन वर्ष होत आली. आपण मात्र त्याला आपल्यातच असल्यासारखं समजून दिवस ढकलतोय.जोसेफही असंच का नाही करत? घरात एकटा बसून कंटाळत असेल.’

‘वेळ आहे अजून पण कॅलेन्डर बघून ठेवायला पाहिजे. ॲनिव्हर्सरीला रूस्तमचा फोटो नि तोच दरवर्षीचा मजकूर टाईम्समधे दिला कि रूस्तम भेटल्यासारखंच वाटतं.’

‘तोच मजकूर.. 'जानू, आय मिस यू एव्हरी डे..' ‘

मग तिला आठवलं कि पाचसहा दिवसांनीच आन्टीची ॲनिव्हर्सरीही आलीय्. जोसेफने त्याला घेऊन जाण्याबद्दल तिला रिक्वेस्ट केलेली. असंही तिला फुलं घेऊन जायचंच होतं.पहिलंच वर्ष म्हणून.

ती बाहेर आली तो जॉन जोसेफला विचारत होता..

'तुका कितें जाय? हांव स्टेशन वोचता..'

'गेट मि सम एग्ज. फिश शी बायज् फ्रॉम दॅट मच्छीवाली. शिरिन डोन्ट फरगेट व्हेन दॅट मच्छीवाली कम्स टुमॉरो.. '

मान डोलवत आठवण झाल्यासारखी शिरिन म्हणाली. ' अरे आय ऑल्सो नीड एग्ज. अंकल कॅन यू गेट मि सम?'

तिने जॉनला अंकल म्हटलेलं जोसेफच्या लक्षात आलं.. तो मग डोळे मिचकावीत गमतीने म्हणाला...

'गो डिअर.. अंकल इज गोइंग टू स्टेशन.. ही विल ड्रॉप यू ॲट यूअर शॉप. '

'रिअली? भोत लेट होगया. मेरेकू छोड ना डिकरा. ' शिरिनने गयावया केल्याचं नाटक केलं.

'यू स्टुपिड गर्ल. यू फस्ट डिसाइड क्या बोलनेका. अब्बीच मेरेको अंकल बोला और अबी डिकरा बोलता. '

सगळे हंसायला लागले. शिरिन मग परवानगी गृहित धरूनच त्याच्या मागे बसली. गल्लीतनं बाहेर पडलं कि चॅपेल रोड. त्याच्या पुढच्याच वळणावर तिचं शॉप.

ती पोहोचली तो भिषोन काम करत होता. आदल्या दिवशी घेऊन ठेवलेल्या ऑर्डरचं.

'क्या हुआ भिषोनबाबू? आज माल कैसा मिला? और कलका ऑर्डरका पैसा तुम लेके नै गया. '

'उसमे क्या? आजके देबेन.. माल किन्तु बेशी म्हेंगा हुआ. ऑड्डरका फर्नका माल कम मिला'

'तो क्या करेंगा अब?'

'कुच नै.. थोडा बुके पाम डालके बनाएंगा. '

'और वो डिकरा शॉप खोलनेके टैम कुछ बोला क्या?'

त्याला समजलं ; मिलिंद सकाळी येवून शॉप उघडून चावी देऊन जायचा तेव्हां निरोप द्यायचा..

'हां मेमसाब. आड्डरका बात बोला. कालेज जानेका टैम आके गया. आमार पैलेच आया था. फिर चाबी देके गया...' त्याने दुकानची चावी तिच्या हातीं दिली.

'ओके ओके.'

आप वो ड्रायर खोलना. मेरा रिबन और सीजर अंदर रहे गया कालके.'

'ड्रायर नै रे.. ड्राव्हर.. '

'आपका मोबाईल चालू नै था क्या?.. '

'केम..किसका फोन था क्या? '

मग त्याने सांगितलं कि त्याने एकदोन ऑर्डर घेऊन ठेवल्या होत्या. त्यातली एक तो जातांना पोहोचवणार होता..

शिरिनचे मग फोन सुरू झाले. येणारे नि जाणारेही.. येणारेच जास्त..

ऑर्डरचेच.. त्यामुळे ती खूष.. म्हणून मग भिषोनबाबूही खूष..काम संपवून तो निघून गेला नि एवढयात मिलिंद आलेला दिसला. थोडासा भिजलेला वाटला.ती शॉपवर पोहोचली नि एवढयातच एक बारिक सर येऊन गेली होती..

'केटली वार लागे तने. लई टाईम करते तू मिलिंदभाव. कॉलेज तो कवाच बंद झाला..'

मिलिंद दुकानात शिरतानाच शिरिनचा तक्रारवजा सूर..

'अरे आंन्टी, अब्बीच स्टेशनपे अटक गया था. बारिशके वास्ते.. और ऐसाभी अब एक्झाम सरपर है. लायब्ररीमे बैठना पडता. पोलिसलाईनमे कोई पढने देता क्या?..'

काऊन्टरमागे जात आपली बेकपॅक पाठीमागच्या फळीवर कोऱ्यात ठेवता ठेवता मिलिंद बोलला. हा एक होतकरू विद्यार्थी.

भाभासमोरच्या पोलिसलाईनमधे रहाणारा. वडिल पोलिस. परवडत नव्हतं तरी लटपटी करून शिकत होता..

दुपारच्या वेळी शॉप बंद न ठेवता बसायचा. एवढया दुपारी कोणी कस्टमर येण्याची शक्यता कमीच. त्यामुळे दुकान उघडं रहायचं नि थोडा अभ्यासही व्हायचा. शिरिन घरी जाऊन परत येईपर्यंत बसायचा..

गेली दोनतीन वर्ष तो असाच मदतीला यायचा.

आधी दुध द्यायला घरी यायचा. म्हणजे रूस्तम असतांना. तेव्हांपासून ओळखीचा नि म्हणून विश्वासाचाही. मग रूस्तम गेल्यावर एकटया पडलेल्या तिला हा इमानी पोर काय लागेल ते आणून द्यायला मदत करायचा. कारण तिला सकाळ संध्याकाळ आपलं फ़लोरिस्टशॉप संभाळायचं अस. आता तीच तिची रोजीरोटी होती!

आपली बॅग ठेवल्यावर मिलिंद फ्रिज उघडून आधी गार पाणी प्यायला. शिरिन बघत राह्यली.. 'थोडा भिजूनच आलाय् तरी ह्याला उकडायला लागलं कि काय? '

मग तोंडावर पाणी मारतांनाच बुकेवरही मारायला लागला. म्हणजे सकाळी बंगाली पोरांने बनवून ठेवलेले बुके मागच्या स्टॅन्डवजा फळयांवर आर्टिस्टिकली मांडले होते त्यावरसुद्धा फ्रिजमधलं गार पाणी मधूनच मारावं लागे...

तसा शिरिनचा शिरस्ता होता..फुलं टिकवून ठेवण्यासाठी.. त्याशिवाय बुकेतल्या खालच्या मडपॉटमधे पाणी आहे का बघणं, नसलं तर घालून त्यात एखादी ॲस्पिरिनची गोळी टाकणं वगैरे. त्या

बुकेंना संध्याकाळपर्यंत टिकवायलाच हवं म्हणून. असली कामं तो आवडीने करायचा. जास्तीच्या उरलेल्या चायनीज गुलाब किंवा ऑर्किडसारख्या नाजूक फुलांनाही टिकवण्यासाठी स्टेम सील करून ठेवावे लागत. ते काम मात्र शिरिन स्वत:च घरी करून आणत असे. सकाळी येतायेता दोन कामं ती न चुकता करायची.

एकदोन फ़्लॉवरस्टिक खाली जोसेफच्या घरात लावून यायची नि आन्टी नॅन्सीच्या पाळलेल्या मांजरीला झालेल्या लहान पिलांना दूध द्यायची...

'ए भाव, गिल्ला झाला तरीबी ठंडा पानी कसाला पिते तू? समदा ठंडा पानी फिनिश करा नुको हां. आनि ते स्प्रे कसाला ठेवला तिकरे. ते वापर नि..मी दोपरशी येल तवा ठंडा पानी घेव्न येल..|'

'आन्टी घाबररू नको. मी पाणी किती पिणार?'

'मी पाणी पियाला ऑब्जेक्शन नाय बोलते. ठंडा पानी पिनार ने बिमार होनार. तारी टर्मिनल छे ने एटले कहुं छुं.. अने कस्टमर येल तवा बुकेवर फिरून पानि मारायला पडेल. आनि तू घरला जाव्न आला नाय काय? मंग लंच कवा करनार?'

'आय विल स्किप द लंच..'

'तू इंग्लिशमंदी वार्ता करून लई होशियारी मारू नको. तू लंच करून ये. नाय तर ते हवालदार येव्न माला दम देनार. '

'डोन्ट वरी. माजा पपा भाएरगांव गेला हाय..'

'तू माजी नकल करते काय..आता मी घरला जानार तो पछी तू अंय्याच अटकि जाए. '

मिलिंद हंसून खांदे उडवायचा. त्याला ती गेल्यावर असाईनमेन्ट लिहिण्याचं काम करायचं होतं. दुपारच्या उन्हात कोण कस्टमर येणार?..

मग मधेच शिरिनला सारखा वाजणारा फोन अटेन्ड करायला मिळाला.

'इज धिस शिरिन्स शॉप..? ' तिला मूठभर मास चढलं. आवाज कोणा मुलीचा होता..

'येस डिक्रा..टेल मी हाऊ कॅन आय हेल्प यू? '

मग तिची नेहमीची टेप वाजवल्यावर तिने फळीवरचा एकबुके पुढे ठेवून मिलिंदला वळणदार अक्षरात कार्ड लिहायला सांगितलं. त्याचं इंग्रजी साधारणच होतं. पण अक्षर सुंदर म्हणून.

'ते बाबूला इकरे काम हाय. तो आला का मंग हे बुकेचा डिलिव्हरी करायला सांग तेला. तिकरे कार्टररोडला. कोन आनंदराज करून फिल्लमवाला हाय. '

मिलिंद मग मार्कर घेऊन लिहायला लागला. 'टू..आनंदराज...विथ कॉम्प्लिमेन्टस् फ्रॉम....'

'आय ॲम लिव्हिंग नाऊ. टेक केअर डिक्रा.. त्यां मारा रूस्तम वेट करता होय..'

नेहमीच्या गडबडीने ती मग गल्लीतून स्टेशनरोडला निघाली..

हा असा संवाद रोजच चालायचा.. तो टिंगल करायचा पण तिची माया मिलिंदला कळायची. म्हणून तो कामही मन लावून करायचा, स्पेशली फुलं टिकवण्यासाठी लागणारी मेहनत. ती बंगाली पोरं सकाळी गेली कि दुसऱ्या दिवशी यायची. त्यामुळे त्यांच्याशी मिलिंदची गांठ पडायची नाही. कधी काम नसलं तर संध्याकाळी डिलिव्हरीसाठी शिरिन त्यांना बोलवायची किंवा वेडिंग हॉलवर डेकोरेशनसाठी एखादा इव्हंट मॅनेजर बोलवायचा तेव्हां सकाळी येताना बाजारातून माल आणून शॉपमधे ठेवलेला असे.. तो न्यायला ती पोरं यायची..केव्हांतरी मिलिंदलाही चल म्हणायची. पण आवड असूनही त्याला तेवढा वेळ नसायचा.

दुपारी मात्र शिरिन न चुकता घरी जायचीच. जेवणासाठी किंवा चहा पिण्यासाठी नव्हे तर रूस्तमला वेळेवर ते सर्व देण्यासाठी. तिचं हे सिक्रेट एकदा मिलिंदला अनवधानानेच कळलं होतं..

कॉलेजच्या रजेच्या दिवसात एकदा जिलेटिन पेपर, सिल्व्हर पेपर, रिबन्स असलं डेकोरेशनचं सामान न्यायला तिने मिलिंदला सकाळीच घरी बोलवलं होतं. व्हरांडयात इझीचेअरवर पेपर वाचत बसलेल्या जोसेफला विश करून मिलिंद आतमधेच त्याच्या उजव्या बाजूला असलेला जुना लाकडी जिना चढून वर गेला. नेहमीप्रमाणे

नुकतंच बाहेर झाडांना पाणी घालून झाल्यावर शिरिन आत गेली असावी. तिचा पुढचा दरवाजा उघडाच होता नि ती पाठमोरी रूस्तमच्या फोटोसमोर उभी राहून कायतरी बोलत होती. हातातली छोटी प्लेट नि चहाचा मग तिने फोटोखालच्या कांचेच्या ब्रेकेटवर ठेवलं. मग वळून ती इराण्याच्या हॉटेलसारख्या, मार्बल टॉपच्या गोल कॉफिटेबलजवळ बसली..ती स्वत:शीच म्हणजे रूस्तमच्या फोटोकडे बघून बोलत होती.

'हुँ बपोरे तारा फेव्हरिट केक लई आवीस हां के..'

मिलिंदने दरवाजावर टक टक केल्यावर ती भानावर आली..

'अरे आ डिकरा. बेस नि त्यां. तू पन चा पिते काय? रूस्तमने अत्यारेच आप्यो.. '

तिकडे पहात मिलिंद चकितच झाला. दारातच उभं राहून त्याने मान हलवली..

'अरे. मारा रूस्तम बहु नॉटी थएला छे. केक जोइए कहेछ. तू माला याद कर हाँ के. प्लिज.. उसका बहानेसे हमलोगबी केक खाएंगा.'

शॉपवर गेल्यावर तिने खरंच केक मागवला. पण दिला मात्र नाही तेव्हां त्याला नवल वाटलं.

मग दुसऱ्या दिवशी ती केक घेऊन आली..

आली ती बडबडतच.. 'अरे हूँ भुली गई. जोसेफके वास्ते अब दुसरा लाना पडेंगा..तू एक काम कर ने डिकरा.. वो बंगाली बाबूको दे आनि बपोरे तुजी घरीबी घेवन् जा.'

तो चक्रावूनच गेला. म्हणाला, 'आन्टि आप कल केक लानेको बोला और आज सबको खिलाता. '

'अरे बेटा..कल रूस्तमका बर्थडे था.. सांजे गयापछी हम दोनो सेलिब्रेट किया..वो केक काटेंगा तब्बीच सबको देंगा ने?'

तो ऐकून सुन्न झाला. गेलेल्या माणसाचा बर्थडे. तोही केक कापून.. जसा कांही तो होताच केक कापायला!

न बोलता केक खावा लागला..म्हटलं तर विचित्र पण तितकीच प्रेमळ.....

मिलिंद पेपरची लाईन टाकायचा नि दूध पोहोचवायचा तेव्हांपासून तिला ओळखत होता!

रूस्तमचं अस्तित्व तिने असं स्वत:पुरतं जपलं होतं म्हणूनच तो गेल्यावरही फार दिवस तिने घरी काढले नाहीत. शिवाय त्याच्या आजारपणात बॅन्क बॅलन्स खाली झाला होता..

तो असतांना त्याची सेन्ट्रल बॅन्केतली नोकरी संभाळून हे काम करायच. त्याचे पारशी बॉस सवलती द्यायचे. तेच त्याचे रिश्तेदार होते जणू. एरव्ही त्याला बिलिमोराला का कुठे रहाणाऱ्या एका दूरच्या आन्टीशिवाय कोणीच नव्हतं!

'आय ॲम एन ऑर्फन!' तो स्वत:शीच म्हणायचा..

शिरिनची ममा हॅन्डिकॅप होती ती संजाणला तिच्या भावाकडेच होती. बस्स्..फार पसारा नाही..

त्यामुळे शिरिन शॉप संभाळू शकत होत. सोबतीला एकदोघं बंगाली फ़लोरिस्ट पोरं तेव्हांही येत असत. त्यांच्या पेशातले ते फ्रिलान्सर..सगळीकडे फिरत. त्यांच्या मदतीने शिरिन स्वत:ही ते काम आवडीने करायची. रूस्तमने तिला शिकवलं होतं....

पण हे सगळं अचानकच थांबलं. रूस्तमचा किडनीस्टोन ऑपरेट करून काढला तरी प्रॉब्लेम रहायलाच आणि पुढे ्कॉम्प्लिकेशन्श झाली. मग सगळंच बदललं. अगदी डायलिसिसवर जायची वेळ आली नि येणारा पैशाचा ओघ उलटा वहायला लागला....

वाईटात चांगलं एवढंच कि भाडयाची असली तरी स्टेशनरोडला जागा होती. पहिल्या मजल्यावर. डायलिसिससाठी जातांना रूस्तमला त्रास व्हायचा. तेव्हां हा मिलिंद आणि दुकानावरचे फ़लोरिस्ट मदतीला यायचे. मिलिंदची खूपच मदत झालेली. तशीच जोसेफचीही..

ही रहाती जागाच मुळात त्याच्या मेहरबानीने मिळालेली.

विशेष म्हणजे आन्टी नेन्सीच्या शिफारशीमुळे.. देवासारखी उपयोगी पडली.

कि आईसारखी? असेल...

दुकानापासून हांकेच्या अंतरावर स्टेशन रोडला लागून 'ककूज नेस्ट ' नांवाचा छोटा जुन्या बांधणीचा कौलारू बंगला होता. मुलं

परदेशात स्थायिक झालेली, दोघंच जणं होती.त्यामुळे आंटीच्याच मध्यस्थीने सोबत हवी म्हणून शिरिनला जागा मिळाली,

बाहेरून व्हरांडयातल्या जिन्याने वर जावं लागे. पण जागा प्रशस्त होती. टेरेसफ़्लॅट. तिथे शिरिन आपली नर्सरीची हौस भागवून घ्यायची. खरं तर त्याना नर्सरीचा व्यवसाय करायचा होता. पण तेवढी जागा तीही शहरात कुठे मिळायला. तेही भोवताली टोलेजंग उंच इमारती तेवढयाच उंचीवर गेलेले भाव लावून उभ्या रहात असतांना. त्यामुळे इथे दोघांचीही सोय झाली... लॅन्डलॉर्डची आणि टेनन्टचीही! एकमेकांच्या आधाराने रहात होते. सगळं व्यवस्थित जमून गेलेलं. रूस्तम आजारी पडेपर्यंत...

मग थोडे दिवस सगळं विस्कळीत झालं. तसं तर दोनदा. आधी रूस्तम गेला नि गेल्या वर्षी आन्टी नॅन्सीही. मात्र जाताना शिरिनकडून शब्द घेऊन गेली कि 'जोसेफची काळजी घेईन'. जोसेफ आता एकटा होता. गेल्या वर्षी ख्रिसमसच्या बरीच आधी आंन्टी नॅन्सी गेली..हार्टपेशन्ट होती. बरेच दिवस ट्रीटमेन्ट घेतल्यावरही शेवटी ती गेलीच..

फक्त मुलगी ऑस्ट्रेलियाहून येऊन भेटून गेली. बापाला तिकडे चलण्याचा आग्रह करत होती. तेही बहुतेक प्रॉपर्टी क्लेमसाठीच असावं असं आपलं शिरिनला वाटलं. कारण आजारी आईला भेटायला तिला जमलं नव्हतं! मुलगा तर आलाच नाही!

खाली जोसेफ एकटा मेडच्या मदतीने घर संभाळायचा, तरी शिरिनलाही लक्ष द्यावं लागे. व्हरांडयात इझीचेअरवर बसून तो सिग्रेटी ओढायचा. पूर्वीसारखा चिरूट परवडत नव्हता. तोही आन्टी नॅन्सीच्या आजारात खंक झाला होता. रिटायर्ड माणूस. पैसा जपून वापरावा लागे.

शिरिन शॉपवर गेली कि त्याचं लक्ष असे. शिवाय 'मोसे ' कुत्रा होताच जाग द्यायला. फेरीवाल्यांपासून सावध रहावं लागे. पण त्यांना टाळताही येत नव्हतं. विशेषत: अंडीपाव किंवा मासेवाली हयांची गरज पडायचीच. घराच्या पायरीजवळ ठेवलेल्या वेताच्या मुढयावर बसून आधी नॅन्सी नि आता शिरिन मासे रापून घ्यायच्या. बाकी कामांसाठी शिरिनची पोरं होतीच.

शिरिनही बिचारी आता वरच्या घरात एकटीच तर होती. आन्टीला शब्द दिला होता म्हणून जातायेता जोसेफला हाक मारून जाग द्यायची. थोडीफार प्रोव्हिजन आणून द्यायची. कधीकधी त्याचा चेक नेऊन बॅन्केतनं पैसे काढून द्यायची. तिच्या भाडयाचे पैसे पुरत नसत. मधूनच मिलिंद त्याचा देशी स्टफ आणून द्यायचा...

ह्याशिवाय तिला स्वत:चं घर नि दुकान होतंच. ह्यात तीही पुरती गुंतून गेली होती. रूस्तम गेल्यापासून तिला तेच बरं वाटत होतं. सुरवातीला आन्टी नॅन्सीजवळ आपलं दु:ख शेअर करायची. आता

तीही नाही. जोसेफजवळ फारसं बोलता यायचं नाही. एकाकी असल्यामुळे मग स्वत:ला असंच सतत गुंतवून ठेवावं लागे.

चॅपेल लेन म्हणजे मेनरोडला मि्ळणारी एक गल्ली. तिच्या कॉर्नरलाच शिरिनचं फ़लोरिस्टचं ते छोटं दुकान होत. 'शिरिन्स फ़लोरिस्ट शॉप '

ती त्याला मोठया कौतुकाने शॉप म्हणायची. म्हणजे लोकंसुद्धा म्हणायचीच. पण प्रत्यक्षात ते पानवाल्याच्या टपरी एवढंच होतं. शटर वर केल्यावर पायरीजवळची फळी उघडून आतला एकुलता एक काउन्टर सरकवायचा. तेव्हां कुठे तिला आत बसायला जागा व्हायची. पाठीमागच्या फळयांवर सगळे बुके ठेवलेले. शॉप होतं मात्र मोक्याच्या जागीं त्यामुळे धंदा तसा बरा व्हायच. कारण तिच्या गोडबोल्या स्वभावामुळे शिरिनने आपले कस्टमर जपले होते. पार कार्टररोड पर्यंतचे कस्टमर. बरेचसे शोबिझनेसमधले ; सेलिब्रिटी..

शिवाय हिलरोडवर परेरा अन्डरटेकर होताच..

त्याच्या ओळखीनेही ऑर्डर मिळायच्या. फ़युनरलच्या त्या टिपिकल ऑर्डर खरं तर तिला आवडायच्या नाहीत. पण शेवटी धंदा होता, मेहनत मात्र खूप पडायची.

माणसं नसल्यामुळे कधी कधी डिलिव्हरीच्या ऑर्डर टाळाव्या लागत. अशावेळी मिलिंद किंवा ते फ़लोरिस्ट मदतीला येत. कारण सीझनला वेडिंगच्या गाडया किंवा स्टेज सजवण्याचं काम ती त्यांना

डायरेक्ट देऊन टाकायची. किंवा त्या एरिआतल्या इव्हेन्ट मॅनेजरकडे पाठवायची. चार पैसे जास्त मिळाले कि ते खूष.

पण कधीतरी शिरिन आपल्या गोड वाणीने कस्टमरला पटवायची. तो गाडी घेऊन आपल्या ड्रायव्हरला पाठवी. रूस्तम असतांना सगळं व्यवस्थित जमवायची. पण तो गेल्यावरही तिने सगळं व्यवस्थित हाताळलं. मधला त्याच्या आजारपणाचा काळ तेवढा दगदगीचा गेला... तिच्या भाषेत 'पनोती' लागली. म्हणजे असं ती खालच्या आन्टीला सांगे.

त्यासाठी मग तिने कोणाच्यातरी सांगण्यावरून दाराबाहेर टिव्हीच्या केबलजवळ काळी बाहुली उलटी टांगली होती. हेच तिने खाली आन्टीलाही सांगितलं होतं. त्यावेळी आन्टी नॅन्सी फक्त मान डोलवून हंसली होती, समजल्यासारखं दाखवायला. पण खरं तर शिरिनच्या भाबडेपणालाच. वाटावं कि खरंच तिला समजलं होतं.

पण पुढे जेव्हां तिलाच पनवती लागली तेव्हां शेवटच्या कांही महिन्यांसाठी खरंच ती काळी बाहुली जिन्याखालच्या कोपऱ्यात डोकं खाली करून लटकली!

दोनतीन दिवस ऊनपावसाचा खेळ चालला होता. सार्वजनिक गणपतीचा माहौल नि तिकडे हिलवर चर्चमधे नवीनाची गर्दी. त्यातच दोन दिवस जोसेफला ताप आला. वाटलं इन्फेक्शन असेल. डॉक्टर येऊन इन्जेक्शन वगैरे देऊन गेला. पण त्याने ब्लडटेस्ट करायला

सांगितलं सीझनमुळे मलेरियाची शक्यता रूलआऊट करायला हवी म्हणून. आपला व्याप संभाळून शिरिनने ते केलं. म्हणजे मिलिंदला रिपोर्ट वगैरे आणायला नि डॉक्टरला दाखवायला पाठवलं. सगळं ठीक होतं!

जोसेफने भिंतीवरच्या मदर मेरीच्या फोटोकडे पाहून छातीवर क्रॉसची खूण केली व आन्टीची नेहमी उशाजवळ असणारी रोझरी हातात घेतली. थॅन्क्स् गिव्हींगसाठी.

शिरिननेही संध्याकाळी डोक्याला रूमाल बांधून तोंडाने कांहीतरी पुटपुटत घरभर अगरबत्ती फिरवली! अगदी खाली जोसेफच्या घरातसुद्धा!...

त्यामुळे एक झालं. आन्टी नॅन्सीच्या ॲन्युअल मासला संध्याकाळच्या सव्हिसला जॉनने जोसेफला नेऊन आणण्याचं कबूल केलं तरी सकाळी सिमेट्रीमधे जाणं त्याला शक्य नव्हतं इतका तो विक झाला होता..

मग दुपारी घरी जाण्याआधी बुके घेऊन शिरिन मिलिंदबरोबर सेंट पीटरच्या सिमेट्रीमधे गेली.

रिक्षा थांबवून आत शिरतांनाच पावसाची एक हलकीशी सर येउन गेली. चार शिंतोडे उडाले नि दोघंही शहारले.

दोघंजणं मग स्वच्छ, नेटकं नि प्रसन्न वाटावं अशा चर्चला वळसा घालून मागे नव्याने डेव्हलप होत असलेल्या सीसाईड गे्रव्हयार्डमधे गेले. मिलिंद नांवं वाचत पॅसेजमधून पुढे चालला होता. त्याला हे सगळं नवीन होतं!

मागून शिरिन स्वत:शीच बडबडत चाललेली..

'क्याँ लई जाएछ डिकरा? तने खबर पडेछे के? ते समदा नांव एकसारकाच वाटते..'

इतक्यात मांजरीच्या ओरडण्याचा आवाज आला. मिलिंदचं उजवीकडच्या कबरींकडे लक्ष गेलं.

एक भिजलेली मांजरी मान झटकत, दोन कबरींमधून उडया मारत प्रत्येक कबरीजवळ थांबायची, एकदा 'म्याँव ' करायची नि मग पुढे जायची.

मिलिंदला मजा वाटली. जसं कांही ती नांवं वाचतच पुढे चाललेली..

ती मग पुढे जाऊन ज्या कबरीजवळ थांबून हुंगायला लागली तिथे मिलिंद पोहोचला नि त्याला आश्चर्याचा धक्का बसला. ती कबर खरंच आन्टी नॅन्सीची होती! त्याला प्रश्न पडला कि, 'उडया मारत म्याँव करणारी ती मांजरी बरोबर तिथेच कशी थांबून हुंगायला लागली?'

'नॅन्सी जोसेफ डिकास्टा ' मिलिंदने क्रॉसच्या खाली असलेलं नांव वाचलं, जरा जोरातच.

मग एकदा तिथेच थांबलेल्या त्या मांजरीकडे नि एकदा मागून येणाऱ्या शिरिनकडे पहायला लागला!

शिरिनही त्या मांजरीकडेच पहात होती.

'अरे, आं तो आन्टीनीच बिल्ली छे. चार रोजथी गायब हो गया था. हे इकरे काय करते? आन्टीला भेटायला आला आसल काय?'

मिलिंद कांही बोलला नाही पण एकटक बघत राह्यला. पाय पोटाशी घेऊन ती मांजरी कबरीच्या उशाकडे असलेल्या क्रॉसला खेटून बसली, डोळे मिटून| आईच्या छातीला पिल्लू बिलगून बसावं तशी उबेला बसल्यागत.. कि श्रद्धांजली वाहत होती?

हातातला बुके कबरीच्या त्या चौथऱ्यापाशी ठेवून शिरिन दोन मिनिटं स्तब्ध उभी राह्यली!

मिलिंदही हात पुढे बांधून उभा राह्यला. तेवढी समज होती त्याला.

शिरिनने आधी त्या मांजरीकडे नि मग क्रॉसकडे पहायलं. तिने मग अलगद डोळे मिटले तेव्हां तिला पुन्हा त्या मांजरीचं 'म्याँव' ऐकू आलं. तिला वाटलं आन्टी नॅन्सीच कांहीतरी सांगायचा प्रयत्न करतेय्..

'येस डिअर.. डोन्ट वरी. आय विल टेक केअर ऑफ जो.. ' ती मनात म्हणाली.

तिला पुन्हा एकदा 'म्याँव ' ऐकू आलं. तिला वाटलं आन्टीने 'ओके' म्हटलं. नकळतच तिच्या डोळयात पाणी आलं म्हणून तिने डोळे उघडले तो समोरची मांजर गायब!

तिने वळून मिलिंदकडे पाह्यलं तर तोही सहेतुकपणे तिच्याचकडे पहात होत..

'आं पेली बिलाडी क्याँ गई? '

दोघानीही आजुबाजूला पाह्यलं ; मघाशी उडया मारत आलेली मांजर कुठेच दिसेना आश्र्चर्य वाटलं तरी न बोलता दोघांनीही जाणलं. आन्टीचा जीव अडकला होता तो एकटा पडलेल्या जोसेफमधे!!

संध्याकाळी कसाबसा मासला जाऊन आलेला जोसेफ व्हरांडयाचं नुसतंच ढकलायचं दार ओलांडून पुढे झाला नि पाठोपाठ बाईक लावून जॉनही आत आला. तेव्हां तिथेच बसलेल्या मोसेने एकदा 'भू' करून जाग दिली.मग मेन डोअरच्या बाहेरचं स्प्रिंगवालं अर्ध दार एका हाताने धरून कुलूप काढतांना जोसेफला मांजरीच्या पिलाचा आवाज आला. बघतो तर मीटर बॉक्सच्या खाली एक पिल्लू बसलेलं.

'हाऊ धिसवन केम आऊट? ' जॉनने विचारलं.

'गॉड नोज. तें भाएर -हंवले ! '

पण कुलूप उघडून आत गेल्यावर जोसेफला अल्टारजवळच्या दिव्याच्या मंद प्रकाशात दिसलं कि घरातली तिघं पिल्लं टेबलावर बसून समोर? म्हणजे मेरीच्या फोटोखाली अल्टारवर, फ्रेममधला आन्टीचा फोटो ठेवला होता ; त्याच्याकडे एकटक पहात होती!

म्हणजें हे चौथं पिल्लू? पाचसहा दिवसांपासून हरवलेलं?

मग एकदा म्याव करून तेही त्यांच्यात सामील झालं, आपली भूक विसरून.

जोसेफ बघतच राह्यल! आणि जॉनही...

जिना चढण्यापूर्वी डोकवायला आलेली शिरिनही जोसेफच्या मागे उभी राहून पहायला लागली. ' हे खोदाय, आं पण पाछळ आवी गया? एटला दिवसपछी? गॉड! यू आर ग्रेट!' तिच्या तोंडून शब्द गेले.जोसेफ मागे वळला.

त्याच्या डोळयात पाणी होतं! त्याच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पहात ती म्हणाली ;

‘ तने खबर छे जो? देअर मदर केम टू ग्रेव्हयार्ड टू पे होमेज टू आन्टी. पछी सडनली डिसॲपिअर्ड हो गया! आफ़टर आय प्रॉमिस्ड टू लूक आफ़्टर यू..

सिंपली ग्रेट!

‘सरप्राइझिंग! ‘ जॉनही चकित झाला..

स्वत:च्याही नकळत शिरिनने जोसेफसारखाच छातीवर क्रॉस केला. तिच्याही डोळयात मग पाणी आलं! क्षणभर तीही इमोशनला झाली नि आन्टीच्या फोटोकडे पहात राह्यली.

मेरीच्या फोटोसमोर कॅन्डल लावून जोसेफ मग आन्टीची रोझरी घेऊन बाहेर येऊन बसला. इझीचेअरवर..पुढयात मोसे नि त्याच्या पाठोपाठ आलेली: एवढा वेळ आन्टीच्या फोटोकडे पहात बसलेली मांजरीची पिल्लं, भुकेसाठी ‘म्याँव म्याव‘ करणारी ’ पायांजवळ येऊन बसलेली!..

सगळे जणू त्याचं सांत्वन करत होते... कि धीर देत होते?

बाहेर आल्यावर शिरिनच्याही लक्षात आलं, सगळेच भुकेले असणार..ती जिना चढतांना जॉनला म्हणाली, ‘ जॉन वेट हां. हम सबकावास्ते कॉफि लाता..’

जॉनला कळालं कि ही खरंच जोसेफची काळजी घेतेय्, तो वेताच्या मुढयावर टेकला, सगळे अर्धवट उजेडात बसलेले असतांनाच ती वरून कॉफीचा ट्रे घेऊन आली. आधी मोसेचा ब्रेड नि मांजरांसाठी दुधाचं पसरट भांडं खाली ठेवलं, त्यांचा फराळ सुरू झाला नि मग कॉफिचे मग त्या दोघांना दिले. आपला घेऊन ती जिन्याच्या पायरीवर बसली..

कॉफिचे घोट घेण्यापूर्वी मोसेच्या पाठीवर थोपटत सडनली जोसेफच म्हणाला,

'नाउ, ऑल ऑफ अस आर हिअर. धिस इज माय फ़ेमिली. लेट अस सेलिब्रेट नेन्सीज ॲनिव्हर्सरी टुगेदर. शी विल बी हॅपी! '

हे कोणाच्या लक्षातच आलं नव्हतं. जॉन आणि शिरिन एकमेकांकडे पहातच राहयले. मग जागेवरनं उठून दोघांनी आपापले कॉफिमग त्याच्या मगला भिडवले नि म्हणाले,

'चिअर्स! '

सगळं समजल्यासारखा त्याच्या फेमिली मेंबर्सनीही प्रतिसाद दिला ; आपापल्या भाषेत!

©©©©©

** बाएना **

समोर चर्चच्या आवारातल्या क्रॉसवर कबुतरांनी केलेली नि त्याच्या पुढयातल्या अर्धवट जळक्या मेणबत्त्यांमुळे झालेली घाण साफ करणाऱ्या सोमजीकडे एकटक पहाताना, आपल्या व्हरांडयात इझिचेअरवर बसून विचार करणाऱ्या जोसेफिनची तंद्री लागली होती. हातातली रोझरी केव्हां पडली कळलंच नाही.

तिला कळेना, गांवात फारच थोडे जुने कॅथलिक राह्यले होते.. आणि चर्चलाही फारशी गर्दी नसतांना अल्टार काळा पडण्याएवढया मेणबत्त्या कोण लावत असेल.... गोव्यात ठीक होतं पण इथे गुजराती भाषिक खारवी क्रॉसच्या समोर उभंसुद्धा रहात नाहीत. ते सगळे स्वाध्याय का काय ते, तिकडे त्या दिदीच्या प्रवचनाला जातात हे गेले कांही महिने इथे राह्य़ल्यामुळे फादर जोकिम कडून ऐकलं होतं.

'अरे अरे..क्या करता मॅन.. क्रॉसका उप्पर पांव रखता? यू स्टुपिड!'

ती अचानक अल्टारवर चढलेल्या सोमजीकडे पहात आपल्या कोकणी हिंदीत ओरडली..

गांगरलेल्या सोमजीने तिच्याकडे रागावल्यासारखं पहात चट्कन खाली उडी मारली.. त्याला ह्या नव्याने आलेल्या आंटीचा जाच वाटायला लागला. तो मग मोठया गेटजवळचा कोणा सेंटचा पुतळा साफ करायला गेला.

‘आपल्या मेडच्या यायच्या वेळेसच हा सोमजी बरा येतो. कायतरी कनेक्शन आहेच. स्वाध्यायवाल्यांनी हयाच्या व्यसनांना आळा घातला तरी हे लोक म्हणावे तसे सुधारले नाहीतच असं फादर म्हणत होते ते खरं असावं. ते ह्या लोकांशी मोडकंतोडकं गुजराथी बोलतात. आधीच्या फादर ॲन्जेलोना फारसं जमायचं नाही.

ते वसईचे! त्यामुळे मराठी जमायचं. पण बिचाऱ्याना प्रिचिंग करत असतांनाच लकवा मारला.. आपल्या त्या ‘सोकॉल्ड’ शिपी नवऱ्यानेच, किथ वाझने त्याना वसईला नेऊन सोडलं; त्यांच्या मेट्रन ममीकडे..हे सगळं इथे आल्यावर कळलं, फादर जोकिमकडून. "आपल्या लेखी, नवरा अजूनही बेपत्ताच होता..आपल्याला फसवून गेलेला.. बास्टर्ड..’

तोंडात आलेली शिवी तिने परतवली. कारण त्या ‘बास्टर्ड‘ नेच ठेवलेल्या प्रॉपर्टीसाठी ती इथे आली होती! फादर जोकिमच्या सांगण्यावरून... नाहीतर गोव्यात होतीच कि भावाच्या घरात. पोर्तुगीज मिशनस्कूलमधली नोकरी.त्याची आता सरकार बदलल्यावर कांही पेन्शन वगैरे शक्यच नव्हती. तरी खासगी टीचरच्या नोकरीचे चार पैसे गाठीला होते, म्हणून भावजयही कुरकुरत नव्हती फारशी. आणि ममीच्या आजारपणात तिनेच तर सगळं केलं. आता अचानक नवऱ्याच्या विलमुळे मिळालेल्या ह्या प्रॉपर्टीची विल्हेवाट लावून जावं म्हणून ती आली होती..

अचानक कावकाव ऐकून ती दचकली. कबुतरं आहेतच आता कावळेही? जोसेफिनचं समोर लक्ष गेलं तर असंख्य कावळे. समोरच्या चर्चच्या क्रॉसवर नि भोवताली असलेल्या भिंतीवर नि तुरळक असलेल्या झाडांवरही. तिच्या लक्षात आलं. गांवाच्या खालच्या अंगाला असलेल्या दर्यावर मासळीचे ट्रॉलर आले असणार. तुरळक सरी सोडल्या तर पाऊस जात चालला होता. श्रावणी पौर्णिमे नंतर लगेच फुटकळ मच्छिमार आपापले डोल घेऊन समुद्रात जायला लागलेले. मोठे ट्रॉलर मात्र भरतीच्या वेळी आत किनाऱ्याकडे शिरणारी अमाप मासळी घेऊन येणार. तेच परतले असणार.

म्हणजे तिची मेड लालन आज कदाचित येणार नाही. आईबापाच्या मदतीला जावं लागायचं तिला. लिलावात खरेदी केलेल्या मासळीचं सॉर्टिंग करायला. दर आठवडयाला एखादी रजा व्हायचीच. एखादवेळी जरा उशिरा येईलसुद्धा. सोमजी बरोब्बर तिची कामाची वेळ साधूनच समोर चर्चच्या साफसफाईसाठी यायचा ; म्हणजे असं जोसेफिनला वाटायचं. बिचाऱ्याची निराशा होणार आज..

स्वाध्यायची प्रवचनं सुरू झाली कि संध्याकाळी सगळे खारवी स्वच्छ कपडे घालून तिकडे हजेरी लावायला जायचे. किती नि काय कळत होतं कोण जाणे. पण दिदी छान बोलते असं म्हणायचे. त्यामुळे दारू, व्यसनं नि मारझोड मात्र कमी झाली असं फादर जोकिम सांगायचे. गावातल्या राममंदिरात त्यांना फारसा इंटरेस्ट नसावा..

चर्चला येणाऱ्यांची संख्या तशी कमीच. पुढची पिढी सगळी दूर गेलेली.

शेजारच्या कुटुंबातनंही अर्धवट वयाची माणसंच. कसल्यातरी एजन्सी किंवा व्यापारासाठी स्थायिक झालेली. बऱ्यापैकी गुजराथी समजणारी; बोलू शकणारी. आधीच्या फादर ॲन्जेलोना फारसं जमायचं नाही! पण ते वसईचे, मराठी जाणणारे. म्हणून समजायचं मात्र. पण आताच्या फादर जोकिमना तिच्यासारखी थोडी अडचण व्हायची. कारण तेही गोव्याचेच. त्याना म्हणे पोर्तुगीच चांगलं यायचं. तसं तिच्या भावालाही यायचं. ती स्वत: मिशनस्कूलमधे शिकवायची. पण इथे गुजराती भाषिक समाज जास्त. इथल्या तिच्या समाजातल्या बहुतेकांची मुलं मात्र शहरात किंवा परदेशात. ती मेडशी बोलून थोडंफार समजायला लागली होती.

... 'आता ही बया जरा उशिराने आलीच तर आपण समोर चर्चमधे असणार.

आपल्यालाही आता उठायला झालंच. तयार व्हायला हवं! संध्याकाळच्या माससाठी. ' हे फक्त मनाशीच. कारण अजून शेजारच्यांपैकी कोणी तयार झाल्याचं दिसलं नाही....

लिलाव होऊन दलाल लोक टेंपो भरतील त्यानंतरच म्हणजे अंधार पडल्यावरच सर्व्हंट येणार. कावळयांची मात्र चंगळच म्हणायची, नेहमीच दिसायचे खाली किनारपट्टीवरच कोळीवाडे. तिथे वाळणारी नि दुरूस्तीची जाळी नि रांगेने दिसणाऱ्या वाळत घातलेल्या सुकटाच्या दोऱ्या. सगीकडे कावळे कसे अगदी नजर ठेवूनच असायचे जणू. नुसता कलकलाट.

गोव्यात असलं कांही नव्हतं. आधी शाळेच्या नोकरीसाठी ती दूरच होती तिथेही नि मग तिच्या भावाच्या प्रशस्त वाडीतही सगळं शांत शांत वाटायचं. क्वचित् समुद्राची गाज ऐकू यायची. बस्स्.. पायवाटेपलिकडचं चॅपेल नि फाटकाजवळचा आय्एनएस लिहिलेला क्रॉस सोडला तर एरवी सगळीकडे भरपूर झाडंच. बहुतेक माडच. इथे मात्र किनाऱ्या जवळची ताडाची तुरळक झाडं सोडली तर झाडं तशी कमीच दिसत होती..

हातातली रोझरी गळ्यात घालतांना तिचं समोर लक्ष गेलं नि ती गुडघ्यांवर हात टेकत अर्धवट उठली.

'गुड इव्हिनिंग फादर. '

आपल्या बैठ्या घराच्या व्हरांडयातूनच समोर बघत, तिने सोशल वर्कर जॉन बरोबर बोलत बोलत, चर्चच्या बाजूला असलेल्या पेरिश ऑफिसच्या पायऱ्या उतरणाऱ्या फादर जोकिमला विश केलं.

'गुड इव्हिनिंग मिस बाएना. हाऊ आर यू? कमिंग फ़ॉर मास, नो?'

त्यानी तिला अर्ध्या तासाने होणाऱ्या मासची आठवण करून दिली. आजकाल मधल्या वारी संध्याकाळच्या मासला गांवात उरलेल्या वयस्कर लोकांखेरीज फारसं कोणी येत नसे.

'येस् फादर.. गेटिंग रेडी सून. '

फादर हंसले. पेरिश ऑफिसमधे पार्टटाईम काम करणाऱ्या जॉनला ते चर्चच्या फीस्टसाठी येणाऱ्या दोघी नन्सची व्यवस्था

करायला सांगत होते. त्यातली एक शिकाऊ. सप्टेंबरमधे मदर मेरीच्या वाढदिवसाला स्पेशल माससाठी खास मुंबईहून येणाऱ्या नन्स. फादर आपला पांढराशुभ्र गाऊन सावरत मग चर्चच्या मागच्या आवारात आपल्या खोलीकडे गेले. त्यांना वाटत होतं कि समोर एकटयाच रहाणाऱ्या मिस् जोसेफिन बाएनाकडेच ती जबाबदारी सोपवावी. पण कांही महिन्यांपूर्वीच गोव्याहून ह्या लांबच्या गांवात नि वेगळया वातावरणात येऊन पडलेल्या जोसेफिनला रूळायला जरा वेळ लागला. तिला हे जमेल का नाही असाही विचार त्यांच्या मनात आला.

आपल्या आरामखुर्चीला हाताचा रेटा देत जोसेफिन मग उठलीच. आत जाऊन ड्रेस चेंज करायला हवा म्हणून.

ह्या परक्या गांवात हा एकच माणूस तिला जवळचा वाटायचा. मूळ गोव्याचा असल्यामुळे असेल. ती स्वत: अजून इथे रूळली नव्हती. तशी तिची इच्छाही नव्हतीच. उभा जन्म गोव्यात भावाकडे काढल्यावर केवळ इस्टेटीच्या विल्हेवाटीसाठी तिला इथे यावं लागलं होतं.....

ढगळ फ्रॉक घालणाऱ्या सुमार रूपाच्या नि तिशीपर्यंत वय वाढलेल्या जोसेफिनचं लग्न होत नव्हतं. स्वतंत्र राज्य झालं तरी गोव्यात अजून सुधारणा व्हायच्या होत्या. त्यामुळे बेताच्या शिक्षणावरही तिला प्रायमरी टीचरची नोकरी मिळाली पण घरापासून दूर. मग ओळखीतल्या कोणाच्यातरी घरी राहून वीकेन्डला घरी यायची. वह्यांचे गट्ठे घेटून. त्या घरच्या आंटीने जोसेफिनच्या भावाला

विचारूनच शिपवरून तिच्या मुलाबरोबरच घरी आलेल्या काळगेल्या पण दणकट तब्येतीच्या कीथ वाझ नावाच्या खलाशाशी तिचं लग्न ठरवलं.

लोकल चर्चमधे नांवाला लग्न करून कीथ नंतर शिपवरच्या नोकरीच्या निमित्ताने परागंदा झाला. म्हणजे दुसऱ्या नोकरीवर परदेशात गेला असं त्या आंटीच्या मुलाने सांगितलं. जोसेफिनच्या नशीबी माहेरी रहाणंच लिहिलं होतं!

भावाला त्याचा ठावठिकाणा न कळल्यामुळे तिने कोर्टाकडून वेडिंग अनालमेन्ट करून घेतलं होतं. ती मिस् बाएना म्हणूनच राह्यली. चर्चनेही परवानगी दिली होती. हातातल्या डझनभर रंगीत बांगडया उतरवून ती पुन्हा कामावर रूजू झाली. वास्कोच्या शाळेत.

त्या नवऱ्याने ठेवलेलं हे घर. छोटा व्हिलाच.

'का ठेवलं असेल त्याने आपल्यासाठी?' तिला पडलेलं कोडं...

अलिकडेच तिला सरकारी नोटीस मिळाली होती. प्रॉपर्टी टॅक्सबद्दल. दमण केंद्रशाषित म्हणून लोकल ॲडमिनिस्ट्रेशनकडून तिला कळवलं गेलं. तेव्हां तिला आपल्या नवऱ्याच्या विलबद्दल कळलं! म्हणजे त्याने विलचं रजिस्ट्रेशन करून ठेवलं होतं. ते फादर ॲन्जेलोना माहित होतं. तेव्हां इथे एकटा रहाणाऱ्या तिच्या नवऱ्याने फादरना विटनेस केलं होतं. पण ते वसईला निघून गेल्यामुळे फादर

जोकिमना हे सर्व कळायला वेळ लागला. त्यांनी पेरिश ऑफिसच्या मार्फत गोव्याला पत्र पाठवून जोसेफिनला कळवण्याची

व्यवस्था केली होती. तिला वाटलं आता मिळतेच आहे प्रॉपर्टी तर येउन तिची विल्हेवाट लावून परत गोव्याला जावं.

पण सहज कोण गि-हाईक मिळणार. पोर्तुगिजांनी चर्चच्या जवळच लिजवर जमिनी देऊन कॅथलिक लोकांना वसवलं होतं. तिथे हा मूळचा ईस्ट इंडिअन असलेला मार्वे का कुठला काळा कीथ वाझ कधी नि कसा पोहोचला हे तिला न उलगडलेलं कोडंच होतं. निदान इथे येईपर्यंत तरी! शिवाय प्रॉपटी घेण्याएवढा पैसा त्याच्याकडे कुठून आला? तो कांही गैरव्यवहारात गुंतला होता का वगैरे शंका होत्याच. नंतर फादर जोकिमनी थोडीफार स्टोरी सांगितली! आधीच्या फादर अँजेलोकडून कळलेली; बिचाऱ्या फादरना प्रिचिंग करतानाच लकवा मारला नि मग ते रिटायर्ड होऊन वसईला निघून गेले म्हणे. असं फादर जोकिम सांगत होते.....

तयार होऊन बाहेर पडण्याआधी तिच्या गोव्यातल्या संवयींप्रमाणे भिंतीवरच्या जीजसच्या फोटोकडे पहात तिने छातीवर क्रॉस केला तो तिची नजर खालच्या साईडबोर्डवर ठेवलेल्या तिच्या त्या सोकाल्ड नवऱ्याच्या फोटोकडे गेली. तिकडे तिने एक तुच्छतेचा कटाक्ष टाकला.

एवढयातच दारात तिची मेड येऊन उभी राहय़ली. तिच्याशी बोलायएवढा वेळ नव्हता. ती गुजराती खारवी. गेल्या कांही महिन्यात भाषेचा थोडाफार परिचय झाला असला तरी् तिचं हेल काढत बोललेलं गुजराती बाएनाला कळायचं नाही नि बाएनाचं कोकणी ढंगाचं हिंदी त्या मुलीला कळायचं नाही.

‘तुम किदर गया था मॅन? हम रास्ता देखताय्. ’

‘दर्यापर ट्रोलर आव्या ने. एटले बापू बोला जाऊं से. ’

हे तर जोसेफिनला माहितच होतं. तिने नुसतीच मान हलवली.

‘हवे वासण ने झाडूकटका करी आपू के?’

‘अब बत्ती लगानेका पयले कैसा करेंगा? अबी हम सामने प्रेअरकावास्ते जाताय्. तुम थोडा टाईमका बाद आना. ’

मान हलवून ती मुलगी चर्चकडे पहात गेली असं जोसेफिनला उगाचच वाटलं. तिने हॉलचं दार नुसतंच ओढून लावलं नि बाल्कनीच्या ग्रीलडोअरचं लॅच लावून घेतलं. तिला आश्चर्य वाटलं ते ह्या गोष्टीचं कि..

‘आपण ज्याला गलथान नि बेजबाबदार ठरवलं त्या नवऱ्याने हे सगळं कसं नि कोणासाठी केलं असेल. त्याने खरंच लग्नं केलं असेल का बोटीवरनं येताना नुसतीच कोणी आणून ठेवली होती कोण जाणे. मग आपल्याकडेच परत का नाही आला? का आपण त्याला आवडतच नव्हतो?’

तिला वाटलं, फादर जोकिमना कांहीतरी नक्कीच माहित असणार. फादर ॲन्जेलोला वसईला पोहोचवून परतलेल्या किथ वाझचा नव्याने आलेल्या फादर जोकिमशी कांहीतरी कॉन्टक्ट झालाच असेल. ते तिला सांगत नसावेत.

ह्या प्रॉपर्टीचं काय करायचं ह्याचाही विचार पक्का होत नव्हता. इथे बँक अकाउंट नव्हता. दोनतीन महिने होऊन गेले. तिच्या जवळचे पैसे संपत आले. थोडयाच दिवसात व्यवहार ठप्प होणार..

एकदा फादर जोकिमशी बोललं पाहिजे.गोव्याला फोन लागत नाही नि लागला तरी तिच्या वयस्कर भावाला नीट ऐकू येत नाही. भाचरं अशीच लांब गेलेली. तिला कांहीच करता येत नव्हतं, नि सुचतही नव्हतं!

'आय मस्ट लीव्ह इट टू ऑलमायटी!' असं स्वत:शीच म्हणत ती पायरी उतरली..

हळुहळू डुलत मग ती थोडा वेळ होता तरी चर्चच्या प्रेअरहॉलमधे जाऊन बसली. समोर अल्टारच्या पलिकडे भिंतीवर असलेल्या, कडेवर इनफंन्ट जिजसला घेतलेल्या मदर मेरीच्या प्रतिमेकडे एकटक पहात बसली. बेंचवर दोन्ही हात एकमेकात गुंफून विचार करत राह्मली!

' मदर, तुझा वाढदिवस आला. माझे असे किती वढदिवस उरलेत ते तुलाच माहित! पण ह्या

पसाऱ्यातून मला लवकर मुक्त कर..'

.....

दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारच्या घरातलं वयस्कर जोडपं बाजारहाट करून परतलं तेव्हां जोसेफिनची दुसरी मेड दारातल्या

पायऱ्यांवर ओला फडका मारत होती नि जोसेफिन जाळीच्या दारातून तिला सूचना देत होती.

'ये होनेका बाद उप्परका रूमबी ऐसाच साफ करना. उदरबी कितना खराब हो गया होंएंगा. कितना टाईमसे खोलाच नै. '

'ना बाबा ना.. आजे एक दिवसमा बद्दा न करी शकाय.. काले करी आपिस. ' हातातला फडका पुन्हा बादलीत बुडवून पिळताना मेड बोलली. जोसेफिनला समजलं.

'तुम रोज लेट आताय और ऐसाच बोलताय. '

'अरे बाय, मे कह्यूं ने....काले सवारमा वेल्ला आवीस. '

दोघींचा संवाद आपापल्या भाषेतून. समजत होतं दोघीनाही. ते जोडपं हंसत आपल्या घराकडे वळताना उपचार म्हणून जोसेफिनला विश करून गेलं..

'गुड मॉर्निंग मिसेस वाझ. '

'मॉनिंग. ' असं जिवणी ताणून तोंडदेखलं बोलतांना जोसेफिनच्या कपाळाला आठया पडल्या. वाझ आडनावाची ॲलर्जी असल्यागत!

फादर जोकिम सोडून इथले भोवतालचे लोक तिचा मिसेस वाझ म्हणूनच उल्लेख करायचे. मनातून आवडायचं नाही तरी ती ते दाखवत नव्हती. इथल्या लोकांशी दोनतीन महिन्यात फक्त तोंडओळखच

झालेली. त्यातून समजलं ते एवढंच कि किथ वाझ गेली कांही वर्ष इथे एकटाच येऊन जाऊन असायचा...

पूर्वी केव्हांतरी त्याची एक कझिन मुलीला घेऊन आली होती. तेव्हां त्यांच्यात जोरात भांडण झालं. फादर ॲन्जेलोने मध्यस्थी करून तिला परत पाठवून दिलं. ती त्याची कझिन असल्याचं फादर ॲन्जेलोने लोकांना सांगितलं. त्या पेरिश ऑफिसमधल्या सोशल वकर्रच्या मार्फत! म्हणून ते तरी समजलं.

'गॉड नोज!'

जोसेफिनच्या डोक्यात बऱ्याच शंका होत्या. त्या घेऊनच ती आत गेली, स्वत:शीच हातवारे करीत नि विचार करीत!

'ती खरंच त्याची कझिन होती का आणि कोणी? मग तिला सोडून किथने विल आपल्या नांवाने का केलं असेल? त्याचे इतर नातलग नव्हते का? तो शिपी असल्याने लग्नाच्या वेळी तो एकटाच होता. तो ईस्ट इंडिअन असल्यामुळे मालाड का मार्वेला त्याचं घर होतं. तिथे त्याची म्हातारी आई होती. पण आपल्याला त्याने तिकडे कधीच नेलं नाही नि आता त्याला आपल्याला सोडून दिल्याचा गिल्ट होता असणार. '

विचारांच्या तंद्रीत ती हॉलमधल्या डायनिंग टेबलजवळ येऊन बसली. भिंतीवर जीजसच्या तसबिरीकडे पहाताना खालच्या साईड टेबलवर ठेवलेल्या त्या किथच्या फोटोकडे तिची नजर गेली. हात लांबवून तिने, ज्याचा सारखा बास्टर्ड म्हणून उल्लेख करायची त्या

किथचा फोटो उचलला. ज्याचा कधी सहवासच नव्हता त्याच्याबद्दल प्रेम कसं वाटावं? तरीही तो आपल्याकडे बघून हंसतोय असं क्षणभर वाटलं.

एवढयात बाहेर चाहूल लागली म्हणून तिने तो फोटो जागेवर ठेवला नि आपला वयानुसार स्थूल झालेला देह सावरीत बाहेरच्या व्हरांडयात आली. तो समोर तो सोशल वर्कर जॉन उभा. बंद गळयाचे ग्रे कलरचे गाऊनसारखे पायघोळ ड्रेस ; गळयात मोठा क्रॉस असलेली रोझरी आणि नर्सेससारखे डोक्याला पांढरे रूमाल अशा दोन नन्सना घेऊन! एक मोठाड वाटली, जरा गंभीर नि दुसरी त्यामानाने पोरकट दिसत होती. अवखळ मुलीसारखी!

'मॉर्निंग मॅम. दे आर अवर गेस्टस् फ़ॉर अ वीक. विल बी रिटर्निंग आफ़टर द स्पेशल मास ऑन एट्थ.. मदर मेरीज बर्थडे.. '

' या. आय नो. फादर टोल्ड मी लास्ट इव्हिनिंग. लेट देम स्टे ऑन टॉप. बेडस् आर देअर. आय स्लीप हिअर ओन्ली. कॉज आय कान्ट क्लाईम्ब द स्टेअर्स.'

'डझन्ट मॅटर. दे आर सिस्टर मारी ॲन्ड सिस्टर स्टेला..'

'हॅलो मॅम. डोन्ट बॉदर. वुई विल मॅनेज. ' जरा पोरकट दिसणारी सिस्टर स्टेला बोलली. त्या दोघी मग व्हरांडयातल्याच जिन्याने वर गेल्या. स्टेला जरा अवखळच वाटली. मागून ती जराशी प्रौढ दिसणारी मारी.

‘जॉन! कॉल देट बॉय फ़ॉर क्लिनिंग..बिकाज स्वीपर हॅज जस्ट लेफ़्ट. माय मेड कम्स इन द इव्हिनिंग..’

‘येस आंटी. ’ असं म्हणून जॉन निघून गेला. जोसेफिनला हा मुलगा आवडायचा.

तो आन्टी म्हणायचा म्हणून!

ती त्या मुलींसाठी चहा करायला म्हणून आत जाणार तो त्यातली लहान वाटणारी ती मुलगी स्वत:च खाली आली, डोक्याचा तो रूमाल काढून.

‘आन्टी यू सिट नो. आय विल मेक द टी. ’

‘बट लेट मी शो यू डिअर. ’

स्टेलाच्या आन्टी म्हणण्याचा फायदा घेत जोसेफिनने तिला ‘डिअर’ करून टाकली. पण तिला कांही दाखवावंच लागलं नाही. त्या डिअरने सराव असल्या सारख्या सगळया वस्तू हाताळल्या. जोसेफिन बघतच राह्यली. बसल्या जागी डायनिंग टेबलवर चहाचा कप हातात देणारी स्टेला तिला एकदम आवडूनच गेली. आपल्याच अल्लड मुलीसारखी वाटणारी! ह्या विचाराने ती चमकली पण तिला बरंही वाटलं.

‘एवढया लहान वयात ही का नन व्हायला निघाली.. सगळं तर व्हायचंय अजून हिचं. कोण असेल ही? ‘

हे प्रश्न ती स्वत:लाच विचारत होती! उच्चारू शकत नव्हती. आपला चहाचा मग घेऊन स्टेला सवयीचं असल्यासारखी येऊन बसली.

'कॉल देट सिस्टर मारी ऑल्सो. '

'शी विल कम. '

'यू बोथ मस्ट बी टायर्ड नो?'

'नॉट मच. आय स्लेप्ट इन द ट्रेन. सिस्टर वॉज रिडींग द होली बुक. बाय द वे, कॅन आय कॉल यू आन्टी?' मग उचलून ठेवतांना तिने विचारलं'

'शुअर. ' म्हणताना जोसेफिनच्या खत्रूड चेहऱ्यावर स्मित आलं. तिला बरं वाटलं.

एवढयात बाहेरून हाक आली.

'आन्टी.. किदर सफाई करनेका?' त्याला एवढंच हिंदी येत असावं.

फारसा ओळखीचा नसला तरी आवाज सोमजीचा हे कळलं. ती पुन्हा शरिर झुलवत बाहेर आली नि तिने सोमजीला वरच्या खोल्या साफ करायच्या सूचना दिल्या.

'उप्परका रूम साफ करनेका हाय. हमारा गेस्ट आया; उनका वास्ते. '

समजल्यासारखी मान हलवत सोमजी व्हरांडयातल्याच जिन्याकडे वळला तशी

'तुम इदरीच ठेरो. वो सिस्टरको निचे आने दो. '

सोमजी चक्रावला. त्याला हे सिस्टर प्रकरण समजलंच नाही. तो बघतच राह्य़ला.

एवढयात, एका हातात फादर धरतात तसं छोटं पुस्तक घेतलेली ती सिस्टरच पायघोळ झगा वर धरून पायऱ्या उतरून खाली आली.

तिच्या पायातल्या पांढऱ्या मोजांकडे नि बुटांकडे तो पहात राह्य़ला. जोसेफिनला ते आवडलं नाही

' रास्कल. किदर देखता मॅन. अबी उप्पर जाओ. सामानको हाथ मत लगाना. '

सिस्टर मारी स्माईल करून आत गेली नि पाठोपाठ जोसेफिन मनाशी त्या आन्टी म्हणणाऱ्या स्टेलाचा विचार करत.

'फादर जोकिमना विचारलं पाह्य़जे ह्मा मुलीबद्दल.'

आत गेली तर स्टेला टेबल आवरत होती..

'लीव्ह इट डिअर. आय विल डू इट. '

'आय युझ टू हेल्प अंकल. व्हेन वुई केम लास्ट टाईम. '

'यू केम? हिअर? व्हेन?'

'मेनी इयर्स अगो..विथ माय,मॉम. आय वॉज स्मॉल देन. '

जोसेफिन बघतच राह्य़ली.

‘म्हणजे ही किथच्या त्या भांडकुदळ कझिनची मुलगी? खरंच फादरना विचारलंच पाह्यजे ह्या मुलीबद्दल. ’ ती मनाशीच म्हणाली|

.....

स्पेशल मास झाला. त्या दोघी नन्स आणि सोशल वर्कर जॉनच्या मदतीने चर्च फिस्ट झाली.त्या गडबडीत जमलं नाहीच नि त्या नन्स तिनतिनदा ‘थँक्स’

म्हणत गेल्या. जोसेफिनला चुटपुट लागून राह्यली. विशेषत: त्या स्टेलाबद्दल.

‘फार मदत केली पोरीने. फादरना नि इथे घरीसुद्धा छान रूळली होती.’

मग एकदा वेळ पाहून तिने फादरजवळ विषय काढला. आडवळणाने.

‘आय ॲडमायर दॅट गर्ल, सिस्टर स्टेला.. शी मूव्हड इन द हाऊस ॲज इफ शी बिलाँग्स टू इट..

‘आय डोन्ट नो मच, बट आय वॉज टोल्ड.. शी इज फ्रॉम ऑर्फनेज! शी हॅज टू अंडरगो सम ट्रेनिंग,

सो शी केम. ’

‘बट शी सेड, शी केम बिफोर व्हेन किथ वॉज देअर. शी सॉ किथस् फोटो ॲन्ड सेड ही वॉज हर अंकल.’

‘मे बी. आय डोन्ट नो व्हाय शी टुक अप धिस रिलिजिअस वर्क. फादर ॲन्जेलो

मस्ट बी नोइंग. '

फादर जोकिम जास्त कांही सांगेना. संभाषण तिथेच संपलं तरी जोसेफिनची अस्वस्थता कमी होईना. कारण हे नुसतं कुतूहल नव्हतं. काहीतरी वेगळंच जाणवत होतं तिला...

आपल्या लेखी ज्याचं अस्तित्वच नव्हतं, ज्याच्याशी कधी फारसा संबंधच आला नाही तो नवरा आपल्यासाठी प्रॉपर्टी ठेवील हे तिला आधीच खटकलं होतं.

शिवाय त्या 'कझिन' ची स्टोरी ऐकलीच होती.

'त्या फादर ॲन्जेलोला भेटायला पाहिजे. पण तो वसईला..कसं जाणार..'

काय हरकत आहे? नाहीतरी पैसे संपत आलेत. प्रॉपर्टीचा व्यवहार तर होतच नाही. कोणी कॅथलिक फ़ॅमिली यायला तयार होईल अशी शक्यता दिसत नव्हती मग गोव्याला परत जावं आणि ऑन द वे वसईला फादर ॲन्जेलोला भेटावं. उद्याच बोलूया फादर जोकिमशी. '

तिचं तिलाच नवल वाटलं!..

'आतापर्यंत ज्या नवऱ्याचं नांवसुद्धा उच्चारायला नको वाटायचं त्याची कोण कुठली कधीकाळी भांडून गेलेली कझिन आणि ही चार दिवसांसाठी येऊन राह्य़लेली तिची मुलगी ह्य़ांच्या विचारात आपण

किती गुरफटलो.. पण ती पोर खरंच लाघवी आहे. आपलंच घर असल्यासारखी वावरत होती नि आपल्याला कांही करू देत नव्हती. तिने जीव लावला नि आपलं कुतूहल चाळवलं. प्रॉपर्टीचा विषय बाजूला ठेवून आपण तिचाच विचार का करतो आहोत? ती एवढया लहान वयातच कशी काय रिलिजनच्या विषयात गुंतली. कांहीतरी कारण असेलच कि..'

त्या पोरीबद्दल आस्था वाटली तरी नकळतच आपण आपल्या नवऱ्याचं पूर्वायुष्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतो आहोत हेही जाणवलं. तरीही तिचा मुंबईला जाण्याचा विचार तिच्याही नकळत पक्का झाला नि ती चारच दिवसात मुंबईला पोहोचली; फादर जोकिमचं पत्र घेऊन. फादर ॲन्जेलोसाठी..

फादर जोकिमच्या ओळखीतल्या एका फ़ॅमिलीला भेटून ती वसईला गेली. फादर ॲन्जेलोच्या त्या लायन्स डेन नांवाच्या व्हिलामधे पोहोचली. आधी कुत्रयाने भुंकून स्वागत केलं नि ते ऐकून आतून तिच्यासारखाच ढगळ फ्रॉक घालणारी फादरची बहिण डेबी शरिर झुलवत समोर आली.

'रेन्चो, कीप क्वाएट, कवाबी कोनावरबी भुंकतो काय? स्टुपिड.'

समजल्यासारखा कुत्रा पुढचे दोन पाय लांबवून इझिचेअरजवळ जाऊन बसला.

ती त्याची नेहमीची जागा असल्यासारखा. जोसेफिनने आपली ओळख सांगितल्यावर डेबीने खुर्चीकडे हात करून आत बघत आवाज दिला.

'ॲन्जेलो.. व्हिजिटर फा^र यू||' असं म्हणून ती आत गेली|तशी फादर ॲन्जेलो आपली व्हिलचेअर सरकवत बेडरूममधून बाहेर आला नि मग स्वत:च उभं राहून इझिचेअरवर बसला. त्याला चालायचा त्रास व्हायचा म्हणून.

लगबगीने जोसेफिनने आपली ओळख सांगितली.

' हांव मिसेस वाझ; गोंयचें...नाउ कमिंग फ्रोम दमन. फादर गेव्ह धिस नोट फ़ॉर यू. '

डेबीचं ईस्ट इंडिअन मराठी ऐकल्यामुळे ती कोकणीत बोलण्याच्या विचारात होती बहुतेक. पुढे होऊन तिने हात पुढे केला नि फादरचा उजवा हात हातात घेऊन वाकून त्यावर ओठ टेकवल्यासारखं केलं, रिस्पेक्ट म्हणून. फादरने बोट दाखवल्यावर खुर्चीवर बसतांना तिचं तिलाच नवल वाटलं ; जातायेता आपण ज्याचा 'बास्टर्ड' म्हणून उल्लेख करायचो त्याचं नांव न घेताही मिसेस वाझ हे नांव कसं बोलून गेलो.

'आर यू गोअन?' तो बोलला.

'या. बट मॅरिड टू ईस्ट इंन्डिअन.. वाझ..

'आय न्यू यू विल कम वन डे. डेस्टिनी इन्डिड..'

'यू मस्ट बी नोईंग हिम. '

'या.ही ओन्ली रीच मी हिअर व्हेन आय हॅड स्ट्रोक.'

'वॉन्ट टू मिट धिस गर्ल. सिस्टर स्टेला..व्हेअर इज शी फ्रॉम? '

'नो व्हेअर.. ' फादरचं गूढ उत्तर.

'ॲक्चुअली शी इज फ्रॉम ऑर्फनेज...'

आता गप्पा सुरू झाल्या नि जोसेफिनला आश्चर्याचे धक्के बसायला सुरवात झाली.....

त्या स्टेलाची ममी मॅक्सी मालाडला बापाच्या देशी दारूच्या गुत्त्यामधे काम करायची. ती शिवीगाळ करायची, नि ब्लन्टली गि-हाईकात मिसळायची म्हणून ती लूज कॅरेक्टरची होती असं लोकांना वाटायचं. ती किथ वाझसाठी जीव टाकायची. तरी त्याने तिला सोडलं नि तो निघून गेला नि मधली कांही वर्ष आलाच नाही. तेव्हां तो कुठे होता कोणालाच माहित नव्हतं.

पुढे आला तेव्हां भेटला. ती खूष होऊन त्याच्या गळयात पडली. त्याने तेव्हां तिच्या जवळिकीचा फायदा घेतलाच असणार..

पुढे तिला मुलगी झाली, ही स्टेला..ती माझी नाही असं किथने गरोदर असतांनाच सांगितलं तेव्हां मॅक्सी भडकली नि त्याच्या मार्वेच्या घरी त्याच्या म्हाताऱ्या ममीसमोर जाऊन भांडली. रडल, भेकली. लग्न करूया म्हणायला लागली. पण उपयोग झाला नाही.

नंतर ममी गेल्याचं कळल्यावर तो आला नि प्रॉपर्टी विकून निघून गेला तो एकदम दमणला. तिला सुगावा लागू न देता.. तो बहुतेक तिच्यापासून लांब जायला बघत होता.

फादर ॲन्जेलोची ममी भायंदरच्या ट्रस्ट हॉस्पिटलमधे मेट्रन होती. तिथे ही मॅक्सी उपचारासाठी जायची, बरोबर लहानग्या स्टेलाला घेऊनच. मेट्रनला

तिच्याबद्दल सहानुभूति वाटायची. म्हणून तिला काय झालंय हे मेट्रनने कोणालाच कळू दिलं नव्हतं. फक्त फादर ॲन्जेलोला कळलं होतं कि ती एड्सची पेशन्ट होती!

मेट्रनबाईच्या बोलण्यातून केव्हांतरी तिला वाझचा उल्लेख कळला तेव्हां ती दमणला जाऊन हजर झाली. पैशांसाठी, उपचारांसाठी तिला पैसे पाहिजे होते. किथला तिचा आजार माहित नव्हता. ती किथला 'तुझ्यामुळे मला आजार झाला' असं सांगायला लागली. त्यांचं मोठं भांडण झालं नि किथने तिला निघून जायला सांगितलं. पण फादर ॲन्जेलोने मध्यस्थी केल्यामुळे किथने तिला थोडे पैसे देऊन परत पाठवली.

पुढे किथने फादर ॲन्जेलोपुढे दोन गोष्टींचं कन्फेशन दिलं.

एक म्हणजे त्याने मधल्या कांही वर्षांच्या काळात मित्राबरोबर गोव्यात गेला तेव्हां लग्न केलं होतं. पण नंतर तो त्या बायकोकडे जाऊ शकला नाही.

दुसरं म्हणजे दमणला प्रॉपर्टी घेतली तेव्हां त्याला फिश एक्स्पोर्टचा बिझिनेस करायचा होता.तिथे हळूहळू सेटल होईपर्यंतच मॅक्सी ये ऊन धडकली.

तिने भांडण करीपर्यंत त्याला कल्पना नव्हती कि त्यालाही तोच आजार होऊ शकतो!

'हर कर्सेस!' तो फादरना म्हणाला होता.

मॅक्सीच्या शापाला भिऊन नव्हे पण संशय नको म्हणून त्यानेही टेस्ट करून घेतली आणि एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याचं कळल्यावर तो मनाने कोसळलाच..

पुढे मग त्याच्या लक्षात आलं कि दमणच्या प्रॉपर्टीचं विल करून ठेवावं!

तो फादर ॲन्जेलोला म्हणाला होता..

'ती बाई थोडयाच दिवसाची आहे नि मी तिला पैसे दिलेत फ़ॉर नो फ़ॉल्ट ऑफ माइन. शिवाय ती मुलगी माझीच आहे कि नाही माहित नाही. पण मी गेल्यावर ह्या प्रोपर्टीचं काय होणार? म्हणून मी ती जिच्याबरोबर कधीच संसार केला नाही त्या माझ्या बायकोच्या नांवावर करणार आहे...

त्याने तसंच केलं! विल रजिस्टर्ड करून ठेवलं..

फादर ॲन्जेलो ह्या सगळयाचे साक्षीदार होते. एवढंच नव्हे तर किथने त्यानाच पॉवर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन द्यायचं ठरवलं होतं. पण त्याच्या दुर्दैवाने फादरनाच हाय प्रेशरचा त्रास झाला. त्याना पुढे जेव्हां स्ट्रोक आला तेव्हां किथनेच त्याना घरी वसईला पोहोचवलं.

त्यावेळी त्याला मेट्रनबाईंकडून कLलं कि तिच्या नर्सिंग होम मधून उपचार घेणारी मॅक्सी वारली नि तिच्या गुत्तेवाल्या बापाने लहान मुलीचे हाल करू नयेत म्हणून फादरने आपल्या वसईतल्याच ओ्ळखीने त्या मुलीला एका कम्युनिटी सेंटरच्या ऑर्फनेजमधे ठेवलंय्! नियमानुसार मेजर झाल्यावर तिथे रहाता येणार नव्हतं म्हणून थोडंफार शिक्षण झाल्यावर ती धार्मिक शिक्षणाकडे वळली. तीच ही जोसेफिनला आंटी म्हणणारी स्टेला!!.....

फादर ॲन्जेलोच्या तोंडून सगळी हकिगत ऐकून सुन्न झालेल्या जोसेफिनच्या तोंडून फक्त एक सुस्कारा निघाला! म्हणाली, 'आय वॊन्ट टू मीट हर..'

भान हरपून एकटक फादरच्या चेहऱ्याकडे पहाणाऱ्या तिला शेजारी कॉफिचा मग घेऊन उभ्या राह्य़लेल्या डेबीची चाहूल लागली नि तिने वर बघितलं तेव्हां तिच्या डोळयात डेबीलाही करूणा दिसली.. मेरीच्या डोळयातली! तिला थोपटल्यासारखं करून डेबी आत गेली.

'इज द गर्ल सेफ?'

'या.. फ़ॉर्चुनेटली!'

'व्हेअर कॅन आय मीट हर?'

'शी इज ॲट करमाली नाउ. फ़ॉर हर ट्रेनिंग. '

‘कॅन मीट हर देअर? ॲम गोइंग टू म्हापूसा फ़ॉर मनी..

‘शुअर.. आय विल गिव्ह यू अ नोट फ़ॉर द ॲथोरिटी देअर.. ’

.....

जोसेफिन करमाळीला उतरून तिला भेटली? त्या स्टेलाला! तिला मनोमन वाटत

राह्य़लं कि ही किथचीच मुलगी असली पाह्य़जे. सांवळी पण स्मार्ट..

‘आपण हिला घे ऊन जायचं दमणला. पण का? असं का वाटतंय् आपल्याला? आपली तर ती कोणीच नाही..तिच्या ममीने कधीकाळी किथवर प्रेम केलं असेलही तरी किथलासुद्धा खात्री नव्हतीच. पण त्यात त्या निरागस जिवाचा काय दोष?’

तिच्या डोळयांसमोर इनफन्ट जिजसला कडेवर घेतलेल्या मदर मेरीची प्रतिमा आली. अचानकच तिच्या मातृत्वाला आसुसल्या मनात वात्सल्य दाटून आलं..

‘ज्याचा तिरस्कार वाटत राह्य़ला तोही अगदीच गुंडपुंड नव्हता नि त्याला आपलीही आठवण होतीच. हीसुद्धा समाधानाचीच गोष्ट.. आणि ही पोरही आंटी आंटी करायला लागलीय. हिला सत्य सांगावं का? राहू दे..तिचा समज तसाच राहू दे.. ’

स्टेला जे करत होती ते तिच्या मनाविरूद्ध असल्याचं तिच्या देहबोलीवरून कळत होतं. तिच्यातला अल्लडपणा अजून सरला नव्हता. तरी लहान वयात खूप सोसावं लागल्यामुळे ती गंभीर झाली असावी.

‘हा गंभीरपणाचा मुखवटा नव्हे. गरज म्हणून स्वीकारलेल्या धर्मशिक्षणासाठी हे सारं आवश्यकच असावं!’

जोसेफिनने स्वत:च्या मनाची समजूत घातली नि तिने म्हापशाला जाऊन आपल्या बॅन्केतनं ड्राफ़्ट बनवून घेतल. वयस्कर भावाला कांहीतरी सांगून परतली, त्याला आधार कमी झाला म्हणून वाईट वाटलं! वाटेत स्टेलाला बरोबर घेतलं नि मुंबईहून गुजरातच्या गाडीत बसली.....

एवढया गडबडीत दोनतीन महिने गेले. भर दुपारी दमणला येऊन घर उघडलं. साफसफाई तर करावीच लागणार. बघता बघता ख्रिसमस येईल. ह्या वर्षी तर स्पेशल. त्या कामासाठी सोमजीला बोलवावं म्हणून ती मोठया उत्साहाने गेली. तो नव्हता म्हणून जॉनला निरोप द्यावा तर तो नोकरी संभाळून फक्त संध्याकाळी येणार. थांबणं भागच होतं पण आता ती एकटी नव्हती. स्टेलाने किचनपासून सुरवातही केली..

संध्याकाळी जॉन आला नि आंटीबरोबर स्टेलाला पाहून चकितच झाला..

‘हाय.. हॅलो’ झाल्यावर स्टेला संवयीचं असल्यासारखी आपण होऊन म्हणाली ;

‘आन्टी वुई नीड सम प्रोव्हिजन..शेल आय गो विथ जॉन?’

जोसेफिनने फक्त मान हलवली. मनातून तिला बरं वाटलं. भविष्यातली सोय झाली तर बरंच. जॉन अनमॅरिड होता! जॉनही यंत्रासारखा निघाला..

‘जॉन वेट.. कॉल दॅट सोमजी... फ़ॉर क्लिनिंग..’

‘ही लेफ़्ट आफ़्टर मॅरेज. ’ हे त्याने स्टेलाकडे बघून म्हटलं असं जोसेफिनला उगाच वाटून गेलं..

‘मॅरेज? विथ हूम?’

‘दॅट लालन! यूअर मेड. दे मॅरिड इन मास वेडिंग्ज अॅरेन्ज्ड बाय ‘स्वाध्याय’ डयुरिंग दिवाली!’

आपला अंदाज खरा ठरला म्हणून ती हंसली. ते दोघे निघाले तिकडे बघून तिच्या

मनातही विचार आलाच. आपल्या त्या मनोमन ‘मानलेल्या’ मुलीचा!

संध्याकाळच्या मासला जाण्यापूर्वी एकटीच चहा घेत बसलेली असतांना साईडबोर्डवर ठेवलेल्या किथच्या फोटोकडे ती एकटक पहात होती..

‘यू शूड हॅव एक्सेप्टेड यूअर डॉटर|’ ती जरा मोठयाने बोलली असावी..

तेवढयातच आत येणा¹या स्टेलाने ते ऐकलं..

‘बट आय वुडन्ट एक्सेप्ट हिम अॅज फ़ादर!

‘यू न्यू इट?’ आश्र्चर्य वाटून जोसेफिनने विचारलं.

‘येस. ही नेव्हर एक्सेप्टेड माय मॉम. शी फ़ॉट फ़ॉर मायसेक..आय अॅम लाईक अनवॉन्टेड चाईल्ड फ़ॉर हीम. आय केम विथ यू बिकॉज आय फाउन्ड माय मॉम इन यू! ’

तिने शेजारी बसत जोसेफिनचा हात हातात घेतला..मायेचा तो स्पर्श बरंच कांही सांगून गेला. न बोलता!जोसेफिनला एकदम भरून आलं. तिच्यासाठी हा वेगळाच अनुभव होता.नात्याचा ;.... आणि परिपूर्णतेचाही!

कारण आता ती मिस बाएना नव्हे तर मिसेस वाझ होती!

'येस.. वन्स अगेन..' ती स्वत:शीच बोलली..

****

कथा कशा वाटल्या?

कळवा

विजय खाडिलकर

दूरध्वनि: 23776889,

मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

विजय खाडिलकर

यांची इतर सात पुस्तके.